बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com
# बेरार टाईम्स
मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे



गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१५ गोंदिया | अंक ०८ | बुधवार, दि.२८ जानेवारी २०२६ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027

## जनगणनेत "ओबीसी" कॉलम गायब!
### ओबीसींची पुन्हा फसवणूक

**गोंदिया:–** २४ जानेवारीकेंद्र सरकारने बहुप्रतिक्षित राष्ट्रीय जनगणनेसाठी ३३ कलमी नियमावली जाहीर केली असली, तरी त्यामध्ये ओबीसी (इतर मागास–वर्ग) समाजासाठी स्वतंत्र कॉलम न दिल्याने तीव्र संतापाची लाट उसळली आहे. ही बाब म्हणजे केंद्र शासनाकडून ओबीसी समाजाची उघड फसवणूक असल्याचा आरोप आता जोर धरू लागला आहे.

जनगणनेच्या १२ व्या क्रमांकाच्या सूचीमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचा स्पष्ट उल्लेख असताना, ओबीसींसाठी स्वतंत्र रकाना वगळण्यात आल्याने समाजात प्रचंड नाराजी आहे. निवडणुकांपूर्वी "ओबीसी जनगणना करू' असे आश्वासन देणाऱ्या केंद्र सरकारने प्रत्यक्षात मात्र या वर्गाला "इतर' (अदर) या अस्पष्ट संज्ञेत ढकलून पुन्हा एकदा निराश केले आहे.

विशेष म्हणजे, बिहार विधानसभा निवडणुकीपूर्वी केंद्र सरकारने आगामी जनगण–नेत ओबीसी समाजाची स्वतंत्र जनगणना केली जाईल, अशी ठाम घोषणा केली होती. मात्र, २२ जानेवारी रोजी प्रसिद्ध झालेल्या राजपत्रात त्याचा कोणताही स्पष्ट उल्लेख नसल्याने ही घोषणा केवळ राजकीय स्टंट ठरल्याची भावना ओबीसी संघटनांमध्ये व्यक्त होत आहे.

जनगणनेचा पहिला टप्पा येत्या एप्रिल महिन्यापासून सुरू होणार आहे. यासंदर्भात जारी करण्यात आलेल्या राजपत्रानु–सार जनगणनेसाठी घराची स्थिती, पिण्याचे पाणी, मालमत्ता, मोबाईल, लॅपटॉप, इंटरनेट सुविधा आदी एकूण ३३ निकष निश्चित करण्यात आले आहेत. मात्र, जातीच्या नोंदीबाबत १२ व्या क्रमांकावर फक्त अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि "इतर' असा उल्लेख आहे. या "इतर' वर्गात हिंदू, मुस्लिम, शीख, इसाई, बौद्ध धर्मीय नागरिकांची नोंद केली जाणार असून, ओबीसी समाजासाठी स्वतंत्र कॉलम नसल्याने त्यांच्या लोकसंख्येची अचूक आकडेवारी समोर येणार नाही, हे स्पष्ट होत आहे.

परिणामी, ओबीसी समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थितीचा वास्तववादी अभ्यासच होणार नसल्याची भीती व्यक्त केली जात आहे. स्वतंत्र कॉलम नसल्यामुळे ओबीसी समाजाची नेमकी लोकसंख्या किती, त्यांच्या गरजा काय, आरक्षण व कल्याणकारी योजनांचे धोरण कसे ठरवायचे, असे अनेक गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. यामुळे केंद्र सरकारच्या सामाजिक न्यायाच्या भूमिकेवरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

या पार्श्वभूमीवर विविध ओबीसी संघटनांनी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला असून, राजपत्रात तात्काळ दुरुस्ती करून स्वतंत्र ओबीसी कॉलम जाहीर करण्याची जोरदार मागणी केली आहे. अन्यथा देशव्यापी आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

## बिअर बारच्या विरोधात धोबाटोला(उचेपूर) ग्रामस्थ आक्रमक,जिल्हाधिकायाच्या वाहनाला घेराव



**गोंदिया:** प्रशासनाकडे वारंवार तक्रारी व धरणे आंदोलन करूनही गावातील बिअर बारवर कारवाई होत नसल्याने संतापलेल्या देवरी तालुक्यातील धोबाटोला (गट ग्रामपंचायत उचेपूर) येथील गावकऱ्यांनी आता टोकाची भूमिका घेतली आहे.आज २७ जानेवारीला जिल्हाधिकारी कार्यालय गाठत बारचा परवाना रद्द करण्याच्या मागणीला घेत जिल्हाधिकारी यांच्या वाहनाला घेराव घालत आंदोलनाला सुरवात केली आहे.तसेच सामूहिक आत्मदहन करण्याचा इशारा प्रशासनाला दिला आहे.

देवरी तालुक्यातील धोबाटोला येथील गावक–यांनी ङ्कमे. अरमान बिअर बार तथा रेस्टॉरंटफ याला तीव्र विरोध दर्शविला आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, या बारची अनुज्ञप्ती (परवाना) अवैधरित्या जारी करण्यात आला आहे. या विरोधात ग्रामस्थ गेल्या २७ नोव्हेंबर २०२५ पासून सातत्याने धरणे आंदोलन करीत आहेत. मात्र, प्रशासनाकडून यावर कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही.

ग्रामस्थांनी यापूर्वी गोंदियाचे जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक,देवरीचे उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांना अनेकदा निवेदने दिली आहेत. आम्ही लोकशाही मार्गाने आंदोलन केले, अधिकाऱ्यांच्या भेटी घेतल्या, पण आमची मागणी मान्य झाली नाही. या बारमुळे गावातील शांतता आणि सामाजिक वातावरण बिघडत आहे. अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. प्रशासनाच्या दिरंगाईला कंटाळून आता ग्रामस्थांनी आपला लढा अधिक तीव्र केला आहे.

### बारचा परवाना त्वरित रद्द करा.–

जर सदर बारचा परवाना त्वरित रद्द केला नाही, तर २६ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आम्ही सर्व ग्रामस्थ सामूहिक आत्मदहन करू, असा स्पष्ट इशारा धोबाटोला(उचेपूर) येथील ग्रामस्थानी आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांच्यासह गोंदिय चे जिल्हाधिकारी,पोलिस अधीक्षक यांना निवेदनातून देण्यात आला आहे.

या निवेदनावर सेवंताबाई सर्पा, फुलबासन मडावी, मंगनीबाई नेताम, ज्योतीबाई हलामी, शारदा बघवा, कलेश्वरी धिवकुवार, दुरपतीबाई डेहेलिया, भगवंताबाई धिवकुवार यांच्यासह गावातील शंभरच्या जवळपास गावक–यांच्या स्वाक्षऱ्या आणि अंगठे आहेत.

### २२ लाखाची चोरी करणाऱ्या बाप लेकाला स्थागुशाने १२ तासात केले जेरबंद

**गोंदिया:** जिल्ह्यात फुलचूर परिसरात भररात्री एका घरात घुसून चाकूच्या धाकावर जबरी चोरी करण्यात आली. मात्र, गोंदिया पोलिसांनी आपल्या तपासाचे ङ्कचक्रव्यूहफ असे रचले की,अवघ्या १२ तासांच्या आत आरोपींच्या मुसक्या आवळल्या. स्थानिक गुन्हे शाखेने (ङउइ) बालाघाट सीमेवरून मुकेशकुमार डोंगरे (५९) व आर्यन मुकेशकुमार डोंगरे (२४) बाप–लेकाला ताब्यात घेत त्यांच्याकडून २२ लाख ६ हजार ६४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या घटनेची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक गोरख भामरे यांनी गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम अहेरकर यांना तात्काळ कारवाईचे आदेश **दिले.**

## अन्यायाविरोधात बांधकाम कामगार संघटनेने केले आंदोलन

**गोंदिया :–** बांधकाम कामगार कल्याण मंडळाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ घेण्यासाठी ९० दिवसाचे प्रमाणपत्र सादर करणे व त्यातील अटी–शर्तीची पुर्तता करणे कामगारांसाठी डोकेदुखी ठरली आहे. परिणामी कामगारांना योजनांच्या लाभापासून वंचित ठेवण्याचा कटकारस्थान यंत्रणेचे अधिकारी, कर्मचारी करीत आहेत. या अन्यायाला घेवून ग्रामविकास ग्रामीण रोजंदारी कर्मचारी संघटनेच्या वतीने आज २७ जानेवारी रोजी गोंदिया तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.या आंदोलनात खासदार प्रशांत पडोळे,संघटनेचे पदाधिकारी सुरेंद्र गेडाम,समाजसेविका प्रा.सविता बेदरकर यांनी सहभाग घेत सरकारच्या धोरणावर जोरदार टिका केली.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या वतीने कामगारांसाठी अनेक कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. मात्र त्या योजनांचा लाभ घेण्यासाठी दिलेल्या अटी–शर्तीची पुर्तता करणे कामगारांकरिता डोकेदुखी ठरली आहे. अलीकडे या योजनेच्या लाभापासून यंत्रणेचे अधिकारी, कर्मचारी कामगारांना वंचित ठेवत असल्याचा प्रकारही पहावयास यंत्रणा मिळत आहे.

९० दिवसाचे प्रमाणपत्र सादर करणे गरजेचे आहे. मात्र ते प्रमाणपत्र सादर कुठून करावे, असा प्रश्नही कामगारांपुढे निर्माण होत आहे. स्वयंघोषणा पत्रानुसार कामगार असल्याचा पुरावा देत असतांनाही तानाशाही प्रमाणे वाघणारी कामगारांच्या अर्जाना नामंजुर करीत आहेत.

विनाकारण त्रुट्या काढल्या जातात. त्याबाबतची माहिती देखील त्या कामगारांना दिली जात नाही. एकंदरीत योजनांच्या माध्यमातून कामगारांची चेष्टा केली जाते आहे, असा आरोपी रोजंदारी बांधकाम कामगार संघटनेच्या वतीने करण्यात आला. आम्ही कामगार आहोत, आमचे काय कसूर असा सवालही कामगारांकडून उपस्थित केला जात आहे. या अन्यायाला घेवून कामगार संघटनेच्या वतीने आज २७ जानेवारी रोजी धरणे आंदोलन करण्यात आले. दरम्यान कामगारांची नवीन नोंदणी व नुतनीकरण तसेच बेकायदेशीर पद्धतीने नाकारलेले अर्ज मंजुर करण्यात यावे, लोकसेवा हमी कायद्याची अंमलबजावणी करावी, तीन महिन्यापेक्षा जास्त काळापासून प्रलंबित असलेल्या अर्जाचे नुतनीकरण करण्यात यावे, तालुका सेतू केंद्र बंद करावे, शिष्यवृत्तीचा लाभ तीन महिन्यात देण्यात यावा अशा आदी मागण्यांचे निवेदनही देण्यात आल्याची माहिती सुरेंद्र गेडाम यांनी दिली आहे.

## क्रीडा विभाग अधिकाऱ्यांविना पोरका
### कसे घडतील उदयोन्मुख खेळाडू!




**गोंदिया:–**प्रशिक्षण, सुविधा, प्रोत्साहन, नियोजन, व्यवस्थापन या पंचसुत्रीच्या संगमासह आवश्यक मनुष्यबळ असेल, तेव्हाच खर्‍?या अर्थाने राज्य, राष्ट्रीय व आंतर राष्ट्रीय दर्जाचे उदयोन्मुख खेळाडू घडतील. मात्र गोंदिया जिल्ह्याचा क्रीडा विभाग याला अपवाद आहे. जिल्ह्यातील सहा तालुक्यांमध्ये तालुका क्रीडा अधिकारीच नाही तर जिल्हा क्रीडा अधिकारी पदाची धुरा प्रभारींच्या खांद्यावर आहे. उल्लेखनीय म्हणजे ते याच महिन्यात निवृत्त होणार असल्याने जिल्हा क्रीडा विभाग पोरका होणार आहे.

जिल्ह्यामध्ये क्रीडा संस्कृतीचा प्रसार करणे, खेळाडूंचा विकास करणे, शालेय व आंतरशालेय स्पर्धा आयोजित करणे आणि राज्य शासनाच्या विविध क्रीडा योजनांची अंमलबजावणी करणे यांसारख्या प्रमुख उद्देशांसाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय कार्यान्वित करण्यात आला आहे. यामुळे जिल्ह्याच्या क्रीडा विकासाला चालना मिळते. या कार्यालयार्फे जिल्ह्यामध्ये क्रीडा विषयक धोरण, उपक्रम राबविणे, खेळांना प्रोत्साहन देणे, शालेय स्तरावर विविध क्रीडा स्पर्धा आयोजित करणे आणि खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून देणे. यासह क्रीडा संकुले, प्रशिक्षण केंद्रे यांसारख्या पायाभूत सुविधांची निर्मिती करणे आणि त्यांची देखभाल करणे, जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रांच्या माध्यमातून उदयोन्मुख खेळाडूंना आधुनिक प्रशिक्षण देणे, राज्य शासनाच्या क्रीडा विकासाशी संबंधित योजनांची जिल्ह्यामध्ये प्रभावी अंमलबजावणी करणे, युवा महोत्सवासारखे कार्यक्रम आयोजित करून युवकांना क्रीडा क्षेत्रासाठी प्रोत्साहीत करणे आणि त्यांच्या सर्वांगीण विकासाला हातभार लावणे, ग्रामीण भागा–तील सुप्त आणि नैसर्गिक प्रतिभा असलेल्या खेळाडूंना शोधून त्यांना प्रोत्साहन देणे हा जिल्हा क्रीडा कार्यालय स्थापनेचा मुख्य उद्देश्य आहे. जिल्हा क्रीडा कार्यालये ही जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्राचा केंद्रबिंदू असून, खेळाडूंच्या सर्वांगीण विकासासाठी आणि क्रीडा संस्कृतीच्या संवर्धनासाठी कार्य करतात. याला गोंदिया जिल्हा क्रीडा कार्यालय अपवाद ठरला आहे. जिल्हा क्रीडा प्रमुखाची धुरा प्रभारींच्या खांद्यावर आहे. प्रभारी जिल्हा क्रीडा अधिकारी म?हसकोल्हे हे सालेकसा येथे तालुका क्रीडा अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्याकडे देवरी, आमगाव व गोंदिया या तालुक्यांचा अतिरिक्त प्रभार आहे. जिल्ह्यातील ८ तालुक्यांपैकी दोनच तालुका क्रीडा कार्यालयात अधिकारी कार्यरत आहेत. उल्लेखनिय म्हणजे सडक अर्जुनी, सालेकसा येथील तालुका क्रीडा अधिकारी ३१ जानेवारी रोजी सेवानिवृत्त होणार आहेत. यामुळे आठही तालुका क्रीडा कार्यालयांना अधिकर्‍?यांची प्रतीक्ष राहील. शिवाय ३ क्रीडा अधिकारी पैकी २ पदे रिक्त तर क्रीडा मार्गदर्शकांची तिन्ही पदे रिक्त आहेत. यामुळे खेळाडूसह क्रीडा विकासाचे काम ठप्प आहे. खेळाडूंना प्रोत्साहन, सुविधा आणि शासकीय योजनांचा लाभ मिळण्यास अडथळे निर्माण झाले आहे.

## पालकमंत्र्यांच्या हस्ते अर्जुनी मोरगाव येथे नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाचे भूमीपूजन

**गोंदिया :** राज्याचे उद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), उच्च व तंत्रशिक्षण, आदिवासी विकास, पर्यटन, मृद व जलसंधारण विभागाचे मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री इंद्रनील नाईक यांनी सोमवारी तहसील कार्यालय परिसर अर्जुनी मोरगाव येथे नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाचे भूमीपूजन केले.



यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष लायकराम भेंडारकर, आमदार राजकुमार बडोले, नगराध्यक्षा मंजुषा बारसागडे, पं.स.सभापती आम्रपाली डोंगरवार, जि.प.सभापती पौर्णिमा ढेंगे, माजी जि.प.उपाध्यक्ष यशवंत गणवीर, अपर जिल्हाधिकारी मिनाज मुल्ला, उपविभागीय अधिकारी ज्योती कांबळे व परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.पालकमंत्री श्री. नाईक म्हणाले, नवीन प्रशासकीय इमारतीच्या उभारणीमुळे तालुक्यातील प्रशासन अधिक गतिमान व नागरिकाभिमुख होण्यास मदत होणार असून नागरिकांना शासकीय सेवा अधिक सुलभरित्या उपलब्ध होणार आहेत असे त्यांनी सांगितले.

## गोंदिया जिल्ह्याचा सर्वसमावेशक विकास साधूया-पालकमंत्री इंद्रनील नाईक

**गोंदिया :–** गोंदिया जिल्हयाचा सर्वसमावेशक विकास साधूया यात कुणीही मागे राहणार नाही याची दक्षता घेऊया, असे प्रतिपादन जिल्ह्याचे पालकमंत्री इंद्रनील नाईक यांनी आज प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य ध्वजारोहण समारंभाच्या प्रसंगी केले. कारंजा रोडवरील पोलीस मुख्यालय येथे ७७ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य शासकीय ध्वजारो–हणाचा कार्यक्रम सोहळा आयोजित करण्यात आला, त्यावेळी श्री. नाईक बोलत होते.



श्री. नाईक यांनी यावेळी जिल्ह्यातील समाजातील सर्वस्तरातील नागरिकांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. श्री. नाईक यांनी त्यांच्या मुख्य भाषणात आपला जिल्हा हा धानाचा जिल्हा म्हणून ओळखला जातो असे सांगत, वर्ष २०२४–२५ मध्ये आपल्या जिल्ह्यात धानाचे विक्रमी उत्पादन झालेले होते अशी माहिती दिली. यावर्षी २०२५–२६ मध्ये प्रत्यक्षात १८८ धान खरेदी केंद्रामार्फत १ लाख २८ हजार ६०६ शेतकऱ्यांनी बीम या शासनाच्या पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी केलेली आहे. तसेच ३१ डिसेंबर २०२५ अखेरपर्यंत ५१ हजार ९५९ शेतकऱ्यांकडून १७ कोटी ६८ लाख ३३३.२२ क्विंटल धानाची खरेदी करण्यात आलेली आहे. शेतकऱ्यांच्या चुकाऱ्याची रक्कम शासनाकडून प्राप्त होताच अदा करण्यात येईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना सुरू असून या योजनेचा २१ व्या हप्ता १९ नोव्हेंबर २०२५ रोजी माननीय प्रधानमंत्री यांच्या हस्ते जिल्ह्या–तील २ लाख १२ हजार ७७३ शेतकरी लाभार्थ्यांना थेट खात्यात पोहोचलेला आहे. याच योजनेच्या धर्तीवरच राज्याकडूनही नमो शेतकरी आत्म महासन्माननिधी दिला जातो. या योजनेच्या सातव्या हप्त्याचा लाभाचे वितरण ९ सप्टेंबर २०२५ रोजी करण्यात आले असल्याचे सांगितले.

स्वर्गीय गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा योजना अंतर्गत यावर्षी जिल्ह्यामध्ये एकूण १२४ प्रस्ताव मंजूर झालेले आहेत. त्यापैकी ७५ लाभार्थी शेतकऱ्यांना १५० लाख रुपयांचे अनुदानाची मदत करण्यात आलेली आहे. प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेअंतर्गत ६८३ अन्न प्रक्रिया उद्योगांना कर्ज मंजूर करण्यात आलेले आहे. येत्या काळात कार्यान्वित उद्योग आपल्याला प्रत्यक्ष दिसतील, असे सांगितले.

गोंदिया जिल्हा वन समृद्ध आहे. तेंदू पानांचे संकलन मोठ्या प्रमाणात केले जात असून यानिमित्ताने रोजगार प्राप्त होतो. यासह निसर्गाच्या संपन्नतेमुळे निसर्ग पर्यटन स्थळाला पर्यटकांची पसंती दिवसेंदिवस वाढत आहे. यानिमित्ताने स्थानिक होतकरू प्रशिक्षित युवक युवतींना रोजगारही उपलब्ध होत आहे याचे समाधान त्यांनी यावेळी व्यक्त केले. वन्यजीव व मानव संघर्ष अधून मधून होतो शासनाकडून कारवाईनंतर आर्थिक मदतीचा हात दिला जातो, वन्यजीव व मानव संघर्ष टाळण्यासाठीही योग्य ते पावले उचलली जातील, यावेळी म्हणाले.

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही एक महत्त्वाची योजना असून या अंतर्गत १०० दिवसांचे रोजगार उपलब्ध करून दिले जा–तात. वर्ष २०२५– २६ या आर्थिक वर्षात गोंदिया जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली कामांचे नियोजन करण्यात आलेले आहे. यासाठी ७८.७० लक्ष मनुष्य दिवस उद्दिष्ट साध्य केलेले आहे. रोजगार हमीची कामे योग्य होत असल्याचे कौतुक केले.

केंद्र सरकार तसेच राज्य सरकार क्षयरोग मुक्त भारत करण्यासाठी विविध स्तरावर प्रयत्न करीत आहे. या अंतर्गत जिल्ह्याने डिसेंबर अखेरपर्यंत २ लाख ५३ हजार ६६१ संशयित रुग्णांच्या थुंकीची तपासणी केलेली आहे. यापैकी संशयित रुग्णांवर इलाज करून त्यांना क्षयरोगमुक्त केलेले आहे. यासह जिल्ह्यातील ७ लाख १२ हजार ०३ नागरिकांना आयुष्मान कार्ड वितरित केली असल्याचे त्यांनी सांगितले.

अन्न व औषध प्रशासन विभागही जिल्ह्यात आपले काम चोख बजावत असून जिल्ह्यातील रुग्णांना रक्त कमी पडू नये यासाठी केटीएस हॉस्पिटलच्या रक्तपेढीस रक्त घटक पाठाची मंजुरी देण्यात आलेली आहे. जिल्ह्यातील रुग्णांना औषधेची ही कमतरता भासू नये याकरिता नवीन ७४ औषधे विक्री परवाने मंजूर करण्यात आल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

जिल्ह्यातील महिला बाल विकास विभागाने डिसेंबर २०२५ पर्यंत ७ बालविवाह रोखले असून दोन प्रकरणात गुन्हे दाखल झा–लेला आहे. या विभागाकडून अनाथांना प्रमाणपत्र दिले जातात २०२५ अखेरपर्यंत १८१ मुलांना संस्थाबाह्य अनाथ प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आलेले असून यापैकी आठ मुलांना शासकीय नोकरी मिळालेली आहे. ही आनंदाची बाब आहे. तर सहा मुलांना शैक्षणिक क्षेत्रात याचा लाभ मिळत आहे. मी इथून सांगू इच्छितो आपल्या जिल्ह्यात संकटात सापडलेल्या बालकांना मदत करण्यासाठी १०९८ या टोल फ्री क्रमांकावर फोन करून मदत मागता येते. सुजाण नागरिक म्हणून आपण ते करावे असे आव–ाहन त्यांनी केले, आज या ठिकाणी बालविवाह मुक्त गोंदिया करण्याची शपथ ही देण्यात आली.

जिल्ह्यातील कामगार विभाग चांगले काम करीत असून कामगारांसाठी असलेल्या विविध योजनेअंतर्गत ५ हजार ६९९ कामगारांना आतापर्यंत ६ कोटी ७८ लाख ४०० रुपये थेट बँक खात्यात जमा करण्यात आ–लेले आहे. कामगाराच्या हिताचे शासन करत आहे असे सांगत नोव्हेंबर २०२५ अखेरपर्यंत २३ हजार ३७९ लाभार्थी कामगारांना गृहपयोगी वस्तूंचे वाटपही केलेले आहे. कामगारांची आरोग्य तप–ासणी विभाग करीत असून आतापर्यंत जिल्ह्यातील २४ हजार ११८ बांधकाम कामगार व त्यांच्या पाल्यांची आरोग्य तपासणी केलेली आहे. बालकामगार मुक्त गोंदिया करण्यासाठी ही विभाग कार्यरत आहे, आपण ही आपला सक्रीय सहभाग नोंदवावा असे, आवाहन त्यांनी यावेळी केले.

जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र विभागाकडून युवक युवतींसाठी अनेक कौशल्यपूर्ण अभ्यासक्रम राबविली जात आहेत. या माध्यमातून स्वयंरोजगारांच्या संधी तरुणांना उपलब्ध आहेत. याचा अधिकाधिक उपयोग तरुणांनी करून नोकरी करण्याऐवजी नोकरी देणारे तयार व्हावेत, असे सांगितले.



गोंदियातील पाटबंधारे प्रकल्पातील मध्यम प्रकल्प अंतर्गत जिल्ह्यातील वर्ष २०२५–२६ मध्ये लाभक्षेत्राच्या पावसाच्या पाण्यामुळे १ हजार २६४ हेक्टर सिंचन झाले असून खरीप हंगामाच्या सिंचनाकरिता ३६३ हेक्टरला प्रत्यक्ष पाणी देण्यात आलेले आहे. तसेच उन्हाळी पिकांकरिता १ हजार ४३५ हेक्टरला पाणी देण्याचे नियोजित करण्यात आलेले आहे. शेतकऱ्यांना पाण्याची टंचाई होणार नाही असा प्रयत्न केला जाईल, असे श्री. नाईक यावेळी म्हणाले.

आपला जिल्हा हा आदिवासी बहुल जिल्हा असून देवरी तालुक्यात एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अंतर्गत आदिवासीबहुल भागांसाठी विशेष योजना राबविल्या जातात. शासकीय आदिवासी मुला मुलींच्या वस्तीगृहात ७ हजार २८८ मुले तर ७ हजार २४५ मुली आहेत. मुलींची संख्या मुलांच्या जवळपास बरोबरीची असणे हे जिल्ह्यासाठीही प्रगतीची लक्षण आहे. वर्ष २५–२६ मध्ये मिशन ॲथलेटिकच्या अंतर्गत तब्बल ३१ विद्यार्थी राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी पात्र झाले आहेत. आदिवासी विद्यार्थ्यांची क्रिडा क्षेत्रातील प्रगती नेत्रदिपक असल्याचे समाधान व्यक्त केले.

जिल्हा पोलीस दल अत्यंत उत्कृष्ट काम करीत असून पोलिसांच्या प्रभावी उपायोजनेमुळे १६ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केलेले आहे. ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. जिल्ह्यातील अतदुर्गम नक्षलग्रस्त परिसरात विविध उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी पूर्ण करण्याच्या उद्दे–शाने "पोलीस दादालोरा खिडकी" हा स्तुत्य उपक्रम राबविला जात आहे. पोलीस अधीक्षक व पो–लीस दलाचे कौतुक करतो. या योजनेअंतर्गत नक्षल प्रभावित भागांमध्ये नागरिकांच्या विकासाचा विचार करून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी करण्यात येणारा प्रयत्न प्रशंसनीय असा आहे, असेही ते यावेळी म्हणाले.

जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी शासकीय योजनांचा लाभ घेऊन मुख्य प्रवाहात यावे, मागे कोणीही राहू नये यासाठी शासन प्रयत्नरत असून नागरिकांनी ही साथ तेवढीच महत्त्वाची, असल्याचे सांगितले.

येत्या ३० तारखेपासून आदिवासींचे दैवत असलेल्या कचारगडची महत्त्वाची यात्रा आपल्या जिल्ह्यात सुरु होत असून यासाठी सर्व आदिवासी बांधवांना तसेच जिल्ह्यातील नागरिकांना शुभेच्छा दिल्या. ही यात्रा चांगली व्हावी, पारी कोपार लिंगो चा आशीर्वाद आपल्या जिल्ह्यावर सदैव राहावा. तसेच इतर राज्यातील आदिवासी भाविक या ठिकाणी दर्शनासाठी येत असतात त्यांना अडचण होणार नाही याची दक्षता शासन प्रशासनासह जिल्ह्यातील सर्वच नागरिकांनी घ्यावी, अशी विनंती त्यांनी यावेळी मंचावरून केली.

आपले राज्य विकासाच्या दृष्टीने देशात अव्वल व गोंदिया जिल्हा राज्यात प्रथम राहील यासाठी कटिबद्ध होऊया, असे आवाहन पालकमंत्री इंद्रनील नाईक यांनी केले.

## संपादकीय

# तांदूळनिर्यातीला वेसण

भारत आणि अमेरिका यांच्यात अनेक दशकांपासून व्यापारविषयक वाद असले तरी, ज्याला व्यापकपणे शुल्क युद्ध म्हटले जाते, तो काळ २०१९ मध्ये राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाखाली सुरू झाला. १ ऑगस्ट २०१९ पासून अमेरिकेने बहुतेक भारतीय आयातीवर सुरुवातीला २५ टक्के शुल्क आकारण्याची घोषणा केली. मात्र त्यामुळे भारतावर काही परिणाम होत नाही, हे पाहून २७ ऑगस्ट २०१९ रोजी अतिरिक्त २५ टक्के शुल्क लागू केले. यामुळे बहुतेक भारतीय वस्तूंवरील एकूण शुल्क ५० टक्के झाले. अमेरिकेने विविध व्यापार कायद्यांनुसार या शुल्कांचे समर्थन केले आणि भारताने तेलाची सतत खरेदी केल्याने युक्रेनविरुद्ध चाललेल्या युद्धामध्ये रशियाची एक प्रकारे मदत केल्याचा आरोप लावला.

रशियाकडून कच्च्या तेलाची आयात थांबवण्यासाठी अमेरिका भारताला आग्रह करण्याचे मुख्य कारण म्हणजे युक्रेनमधील युद्धासाठी मॉस्कोला मिळणारा महसूल मर्यादित करणे होय. पाश्चात्त्य खरेदीदारांनी मोठ्या प्रमाणात रशियन तेल टाळल्यामुळे मॉस्कोने चीन आणि भारताला दिलेल्या सवलती आणि स्वस्त किमतीचा फायदा घेत भारताने अल्पावधीतच रशियन कच्च्या तेलाची एकूण आयात सुमारे ४० टक्क्यांपर्यंत नाट्यमयरीत्या वाढवली. अमेरिकेची पोटदुखी वाढण्याचे हे मूळ कारण आहे. पण भारताने अमेरिकेच्या दबावाला बळी न पडता रशियाकडून मिळत असलेल्या कच्च्या तेलाची खरेदी थांबवली नाही. त्यामुळे चिडलेल्या ट्रम्प यांनी आंतरराष्ट्रीय व्यापारात अमेरिकेसोबत करार करण्यास भारतावर येनकेनप्रकारे दबाव टाकण्याचा प्रयत्न केला.

ट्रम्प यांनी नुकताच भारताने बासमती तांदळाचे डम्पिंग केल्याचा आरोप करत भारतीय आयात मालावर शुल्क वाढवण्याची धमकी दिली. व्हाईट हाऊसमध्ये आयोजित एका गोलमेज परिषदेत ट्रम्प बोलत होते. त्यांनी परिषदेत म्हटले की, भारताला अमेरिकेत तांदळाचे "डंपिंग' करण्याची परवानगी दिली जाऊ नये. तसेच भारताने तांदळाचे डंपिंग करू नये. आंतरराष्ट्रीय व्यापार नियमानुसार ते असे करू शकत नाहीत. त्यांच्या म्हणण्यानुसार भारतावर नवीन शुल्क आकारणे हा या समस्येवर एक जलद आणि सोपा उपाय असेल, कारण बेकायदेशीरपणे माल पाठवणाऱ्या देशांवर शुल्क लादल्यास ही समस्या सोप्या पद्धतीने सोडवली जाईल.

काही अमेरिकन शेतकऱ्यांनी तक्रार केली की भारत, व्हिएतनाम आणि थायलंडसारख्या देशांमधून होणाऱ्या स्वस्त आयातीमुळे त्यांनी पिकवलेल्या तांदळाच्या किमती कमी होत आहेत. त्यामुळे अमेरिकेने शेतकऱ्यांसाठी एका संघीय मदत पॅकेजची घोषणा केली होती. भारत अमेरिकेत निर्यात करत असलेल्या तांदळाबद्दल भारतीय निर्यातदार आणि विश्लेषकांचे म्हणणे आहे की, बासमती हा एक विशेष प्रकारचा तांदूळ आहे, जो अमेरिकेत पिकवलेल्या तांदळाचा थेट पर्याय नाही आणि म्हणूनच डंपिंगचा दावा त्यांना मान्य नाही. कारण बासमती तांदळाचा व्यापार विशिष्ट ग्राहकांच्या आवडीनिवडींवर आधारित आहे. आपल्या उद्योगांना संरक्षण देण्यासाठी अमेरिकेने इंटरनॅशनल मॉनिटरी फंड आणि इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन या संस्थांची निर्मिती केली. १९८०-९० च्या दशकात वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन निर्माण केले. या ऑर्गनायझेशनच्या माध्यमातून शेतीचा व्यापार कसा केला जावा याची नियमावली तयार केली गेली. या नियमावलीअंतर्गत कोणत्याही देशाने दुसऱ्या देशात माल डम्पिंग करून स्थानिक शेतकऱ्यांना तोटा होईल अशी कृती करू नये, असे निर्बंध घालण्यात आले आहेत.

ट्रम्प यांनी भारतावर सर्वाधिक टॅरिफ लादले असूनही भारत अमेरिकेमध्ये बासमती तांदूळ डम्पिंग करतो, हे नक्कीच भूषणावह आहे. अमेरिकेने गव्हाच्या बाबतीत क्रांती केली आणि भारताने बासमती तांदूळ पिकवत वाद निर्माण करून या क्षेत्रामध्ये उज्ज्वल यश संपादित केले आहे. बासमती तांदळाला जगभर मागणी असल्याने भारताच्या शेतीक्षेत्रातील चहा बरोबरच बासमती तांदळालाही अनन्य महत्त्व प्राप्त झाले आहे. बासमती तांदळाची जात प्रामुख्याने पंजाब आणि हरियाणा प्रांतात पिकवली जाते आणि भारतातील पहिली आणि एकमेव हरित क्रांती याच दोन प्रांतांमध्ये झाली होती.

वास्तविक, भारताने शेतीमालाच्या निर्यातीसाठी "आग्रेस्को' नावाची संस्था निर्माण केली आहे. त्यामध्ये ५१ टक्के वाटा हा शेतकऱ्यांचा आणि ४९ टक्के सरकारी वाटा अशी पद्धत राबवली गेली आहे. या संस्थेअंतर्गत सरकारी शेतीतज्ज्ञ जगातल्या बाजारपेठेचा अभ्यास करून जास्तीत जास्त दर कोणत्या वेळी आणि कोणत्या मालाला मिळतो याची माहिती संस्थेला देतात. संस्था तेवढाच शेतमाल उत्पादित करून परदेशांना निर्यात करतात. इस्रायल हा वालुकामय प्रदेश आहे; परंतु या संस्थेमुळे तेथील मालाला जास्तीत जास्त दर मिळत असल्याने इस्राएलचा शेतकरी सधन झाला. आपल्याकडे तशी कोणतीही तरतूद नसताना भारताने अमेरिकेमध्ये बासमती तांदूळ डंपिंग करून अमेरिकन शेतकऱ्यांच्या नाकी नऊ आणले. त्यामुळे होणारा ट्रम्प यांचा थयथयाट पाहता भारताने "ऑपरेशन सिंदूर'द्वारे जसे पाकला नमवले होते, त्या पद्धतीने "ऑपरेशन बासमती' करून अमेरिकेलाही नमवले आहे असे स्पष्ट होते.

डंपिंगबाबत वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशनने म्हटले आहे की डंपिंग तंत्राचा वापर करून कोणत्याही देशाने दुसऱ्या देशातील शेतकऱ्यांचे नुकसान करू नये. ते व्यापार तंत्राच्या विरोधी होईल आणि निषिद्ध मानले जाईल. डंपिंगमध्ये एखादा देश दुसऱ्या देशात इतका शेतमाल निर्यात करतो की दुसऱ्या देशातील भाव एकदम कोसळून तेथील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होते. या पार्श्वभूमीवर भरपूर शुल्क लादले गेले असतानाही बासमती तांदूळ इतक्या मोठ्या प्रमाणात अमेरिकेच्या बाजारात कसा पोहोचला, याची सविस्तर माहिती उपलब्ध झाल्यास प्रत्येक भारतीयाला "ऑपरेशन सिंदूर'सारखाच याही घटनेचा अभिमान वाटल्याशिवाय राहणार नाही.

अमेरिकन शेती आणि उत्पादन मोठे असले तरी तेथील फक्त दोन टक्केच नागरिक शेती करतात. त्यांचे क्षेत्र मोठे असते, शिवाय उत्पादन खर्च जास्त असतो. त्या तुलनेत भारतीय शेतकरी नगण्य असूनही आपल्या कौशल्याने आणि मेहनतीने जास्तीत जास्त उत्पादन काढून देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण करतो. पूर्वीच्या काळासारखी या देशाला अमेरिकेकडे अन्नधान्यासाठी भीक मागावी लागत नाही.

# राजाभोज महारॅलीद्वारे पोवार समाजाचा एकतेचा संदेश!





**गोंदिया :-** पोवार समाजाचे आराध्य दैवत चक्रवर्ती राजाभोज यांच्या जयंती महोत्सवानिमित्त शुक्रवारी (दि. २३) शहरात राजाभोज महारॅली काढण्यात आली. यात हजारो पोवार समाजबांधवांनी सहभागी होत समाज एकतेचा संदेश दिला. यावेळी गोंदिया जिल्ह्यातील नागरिकांसह मध्यप्रदेश येथील समाजबांधवही उपस्थित होते.

पोवार समाजाचे आराध्य दैवत चक्रवर्ती राजाभोज यांच्या जयंती महोत्सवाचे औचित्य साधत २३ जानेवारी रोजी राजाभोज महारॅलीचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील छोटा गोंदिया येथील क्षत्रिय पोवार समाज संघटन, फुलचूर क्षत्रिय पोवार समाज संघटन, कुडवा क्षत्रिय पोवार समाज संघटन, मुर्री क्षत्रिय पोवार समाज संघटन, पवार प्रगतिशील मंच गोंदिया, प्रगतिशील शिक्षण संस्था गोंदिया यांच्या वतीने जयस्तंभ चौक एकत्रित होऊन सम्राट राजाभोज यांच्या प्रतिमेचे पूजन करून रॅलीला सुरुवात करण्यात आली.

यावेळी राजाभोज रॅलीचे उद्घाटन आमदार विजय रहांगडाले यांनी झेंडी दाखविली. राष्ट्रीय क्षत्रिय पवार महासभा अध्यक्ष नंदलाल चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली रॅलीला सुरुवात करण्यात आली. यावेळी बालाघाट लोकसभा क्षेत्राच्या खासदार भारती पारधी, परसवाडा क्षेत्राचे आमदार मधू भगत, यावेळी बालाघाट सिवनीचे खासदार भारती पारधी, आमदार मधु भगत, माजी खासदार ढालसिंह भगत, माजी आमदार हेमंत पटले, खोमेश्वर रहागंडाले, पवार प्रगतीशील संस्थेचे अध्यक्ष यु.टी.बिसेन, एड.टी.बी.कटरे,एड.पृथ्वीराज चव्हाण, शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुरेश भक्तवर्ती,सचिव किशोर भगत, माजी जि.प.अध्यक्ष नेतराम कटरे, माजी जि. प. अध्यक्ष पंकज रहांगडाले, जि. प. बांधकाम सभापती लक्ष्मण भगत,नप उपाध्यक्ष संतोष पटले,माजी सभापती संजयसिंह टेंभरे, अर्पण बिसेन, केसरबाई बिसेन, दारासिंग कटरे, डॉ. प्रशांत कटरे, मोतीलाल चौधरी, जिल्हा बँकेचे संचालक दुर्गाप्रसाद ठाकरे, केतन तुरकर, नगरसेवक गोलु बिसेन,सीताबाई रहागंडाले,महिला समिती अध्यक्ष आरती तुरकर, माणिकचंद बिसेन, केतन तुरकर, विशाल बिसेन, डॉ. अजय पारधी, गुरूवेश येळे, नंदुभाऊ बिसेन, कमलेश बिसेन, राहुल बिसेन,गोंदिया पंचायत समितीचे सभापती मुनेश रहांगडाले, गोरेगाव पंचायत समितीच्या सभापती चित्रकला चौधरी, आयोजन समितीचे अध्यक्ष राजकुमार (पप्पू) पटले, सचिव देवचंद बिसेन, उमेश पारधी, राष्ट्रीय पवार क्षत्रिय महासभेचे माजी संघटन सचिव खेमेंद्र कटरे, ओबीसी संघर्ष कृती समितीचे अध्यक्ष बबलू कटरे, शिशिर कटरे, सुनिल पटले, महेंद्र बिसेन, भागचंद रहागंडाले, रवी पटले, दिलीप पारधी, पंकज पटेल, संजय ठाकरे, आशिष रहागंडाले, छोटू बिसेन, कुलदीप रिनाईत, सुरेश पटले, किशोर भगत, संदिप रहागंडाले, राहुल बिसेन, युवा स्वाभीमानचे जितेश राणे, जितेश टेंभरे, अजाबराव रिनायत, डॉ.घनश्याम तुरकर, संदिप तुरकर, गणेश तुरकर, कुणाल बिसेन, माजी सभापती मनोज बोपचे, दिलीप चव्हाण, बाजार समितीचे सभापती तेजेंद्र हरिणखेडे, रवि अंबुले, रमेश अंबुले, अजित टेंभरे, हजारो समाजबांधव उपस्थित होते.

### रॅलीचे आकर्षण

**पोवार सनाज बांधवाची सम्राट राजाभोज यांच्या जयंतीनिमित्त काढण्यात आलेली रॅली आकर्षणाचे केंद्र ठरली होती. रॅलीमध्ये पारंपारीक वाजंत्रीसह खाचर आणि बैलबंडी हे होते. त्याच प्रमाणे ढोला-ताशासह पोवारी नृत्यू आकर्षणाचे केंद्र ठरले होते. लक्षवेधी ठरलेल्या रॅलीच्या बंदोबस्तसाठी शहरात पोलिसांचा चोख बंदोबस्तही पहावयास मिळाला.**

### सर्व पक्ष व मतभेद विसरून एकवटले समाजबांधव

**आराध्य दैवत सम्राट राजाभोज यांच्या जयंतीनिमित्त पोवार समाज बांधव एकवटल्याचे पहाव्यास निळाले. सर्व राजकीय पक्ष व मतभेद विसरून एका मंचावर येवून जयंती कार्यक्रमात समाजबांधव सहभागी झाल्याचे दिसून आले. समाजाच्या विकासासाठी आम्ही एक आहोत, असा संदेशही जयतीनिमित्त पोवार समाज बांधवांकडून देण्यात आला.**

# धान उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी पालकमंत्र्यांना निवेदन



**अर्जुनी/मोरगाव:-** तालुक्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी अन्नदाता धान उत्पादक शेतकरी संघ तसेच विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था संघ अर्जुनी/मोर यांच्या संयुक्त वतीने गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री इंद्रनील नाईक यांना निवेदन सादर करण्यात आले. प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी अर्जुनी-मोर. येथील तहशिल कार्यालयाच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकाम भुमिपुजनाचे वेळी हे निवेदन देण्यात आले.

निवेदनात गोंदिया जिल्हा हा धानाचा प्रमुख जिल्हा असून मागील खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे धान उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. अल्प उत्पादनामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून यावर्षी धानाला तातडीने बोनस जाहीर करावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. धानाला बोनस जाहीर झाल्यास अर्जुनी/मोर तालुक्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल, असे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

तसेच सध्या सुरू असलेल्या कर्जमाफीबाबत शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण असून अल्प उत्पादनामुळे अनेक शेतकरी कर्ज भरण्यास असमर्थ आहेत. त्यामुळे ३१ मार्च किंवा ३० जूनपर्यंत कर्ज भरण्याची अट शिथिल करावी अथवा नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर रकमेची घोषणा करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा अनेक शेतकरी कर्ज न भरण्याचा निर्णय घेण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. याशिवाय आधारभूत धान खरेदीचे प्रलंबित पैसे तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावेत, अशीही ठाम मागणी करण्यात आली आहे.

हे निवेदन अन्नदाता धान उत्पादक शेतकरी संघाचे अध्यक्ष ललित बाळबुध्दे तसेच विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था संघाचे अध्यक्ष ललितकुमार बाळबुध्दे यांच्या स्वाक्षरीने देण्यात आले. या मागण्यांकडे सकारात्मक दृष्टीने पाहून धान उत्पादक शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

## महावितरणचा चित्ररथ ठरला संचलनाचे आकर्षण

**मुंबई:** प्रजासत्ताक दिनाच्या ७७ व्या वर्धापन दिनानिमित्त मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज पार्क येथे आयोजित ध्वजवंदन व संचलनाच्या शासकीय कार्यक्रमात महावितरणचा चित्ररथ आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला.मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ङ्गअन्नदाता ते ऊर्जादाताफ या संकल्पनेवर आधारीत महावितरणच्या या चित्ररथाचे कौतुक केले आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशात सौर ऊर्जेला चालना देण्यासाठी व शेतकऱ्यांना शाश्वत व मोफत वीज उपलब्ध करून देण्यासाठी अन्नदाता ते ऊर्जदाता ही संकल्पना राबवली आहे.मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मागेल त्याला सौर कृषी पंप योजना व मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या प्रभावी अंमलबजावणीतून राज्यातील शेतकऱ्यांना दिवसा मोफत वीज उपलब्ध करून देत या संकल्पनेच्या पुर्ततेला मोठी गती दिली आहे. या योजनांमधून राज्यातील ४५ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध करून देण्यात येत आहे. प्रजासत्ताक आयोजित कार्यक्रमात चित्ररथाच्या माध्यमातून महावितरणने केवळ तंत्रज्ञान नव्हे, तर पर्यावरणाभिमुख व समृद्ध महाराष्ट्राचे चित्र मांडले आहे. देशातील पहिले सौरग्राम ठरलेल्या सातारा जिल्ह्यातील मान्याची वाडीचा देखावा चित्ररथात लक्षवेधक ठरला.

## विकासाची कामे थांबणार नाहीत, जनतेच्या अडचणी सोडवणे हेच माझे ध्येय-आमदार राजकुमार बडोले



**अर्जुनी-मोरगाव:-**विधानसभा क्षेत्रातील पुतळी ते जांभळी रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामाचे भूमिपूजन आमदार राजकुमार बडोले यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी आमदार बडोले आमदार या नात्याने उपस्थित होते. कार्यक्रमास स्थानिक सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, गावातील ज्येष्ठ नागरिक, विविध लोकप्रतिनिधी तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार राजकुमार बडोले म्हणाले की, ङ्गपुतळी-जांभळी हा रस्ता परिसरातील शेतकरी, विद्यार्थी, रुग्ण व सर्वसामान्य नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. पावसाळ्यात दळणवळणाची मोठी अडचण होत होती. या रस्त्याच्या डांबरीकरणामुळे ती कायमची दूर होणार आहे. ते पुढे म्हणाले की, या रस्त्यामुळे शेतीमाल वेळेत बाजारपेठेत पोहोचेल, विद्यार्थ्यांचे शाळेत जाणे सुलभ होईल तसेच आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना रुग्णालयात वेळेत पोहोचणे शक्य होईल. ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी दर्जेदार रस्ते ही प्राथमिक गरज आहे.

कार्यक्रमाच्या निमित्ताने आमदार बडोले यांनी ग्रामस्थांच्या समस्या ऐकून घेतल्या व त्या लवकरात लवकर सोडवण्याचे आश्वासन दिले. जनतेच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही. विकासाची कामे सातत्याने सुरू ठेवून अर्जुनी-मोर. विधानसभा क्षेत्राचा सर्वांगीण विकास साधणे हेच माझे प्राधान्य आहे, असे त्यांनी सांगितले.



## अंगणवाडी ही बालविकासाची पहिली पायरी-जि.प. सदस्या रचनाताई गहाणे

**अर्जुनी-मोरगाव:-** जिल्हा वार्षिक योजना जिल्हा परिषद गोंदिया अंतर्गत ग्रामपंचायत सोमलपूर येथे नव्याने बांधण्यात आलेल्या अंगणवाडी इमारतीचा लोकार्पण सोहळा दि. २६ जानेवारी २०२६ रोजी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषद सदस्या रचनाताई गहाणे यांच्या हस्ते उत्साहात पार पडला.

लोकार्पण प्रसंगी बोलताना रचनाताई गहाणे म्हणाल्या की, ङ्गअंगणवाडी ही केवळ इमारत नसून, बालकांच्या शारीरिक, बौद्धिक व नैतिक विकासाची पहिली पायरी आहे. ग्रामीण भागातील मुलांना दर्जेदार पोषण, शिक्षण आणि संस्कार देण्यासाठी शासनाच्या योजना प्रभावीपणे राबविणे हे आपले सामूहिक कर्तव्य आहे. भविष्यातही सोमलपूर गावाच्या सर्वांगीण विकासासाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी पंचायत समिती सदस्या पुष्पलताताई दृगकर, सरपंच भुमिकाताई ढोक, उपसरपंच उल्हास लेंडे, ग्रामपंचायत सदस्य रेखाबाई झोळे, रुपलताताई हातझाडे, प्रितीकाताई कानेकर (मा.), पोलीस पाटील तुळिशराम बोरकर, पोलीस पाटील तुषार कापगते, माजी सरपंच लिलेश्वर खुणे, तंटामुक्त समिती अध्यक्ष नंदु कापगते, अंगणवाडी सेविका राजगीरे, माजी सरपंच आशाबाई हातझाडे, ग्रामपंचायत अधिकारी सोनवाने, जैराम हातझाडे आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक, महिला भगिनी व शालेय विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे वातावरण उत्साहपूर्ण व आनंददायी होते.

## संविधानाच्या मूल्यांवर चालत सर्वसामान्यांच्या न्यायासाठी कटिबद्ध-आमदार राजकुमार बडोले

**अर्जुनी-मोरगाव:-** राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी तालुका सडक/अर्जुनीच्या वतीने ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहणाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात इंजि. राजकुमार बडोले, आमदार तथा माजी मंत्री सामाजिक व न्याय विभाग यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी उपस्थितांना संबोधित करताना आमदार राजकुमार बडोले म्हणाले की, ङ्गभारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानता, स्वातंत्र्य व न्याय दिला आहे. या संविधानिक मूल्यांचे रक्षण करणे आणि समाजातील शेवटच्या घटकापर्यंत न्याय पोहोचवणे हे आपले कर्तव्य आहे. सामाजिक न्याय, विकास आणि सर्वसमावेशक प्रगतीसाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन काम केले पाहिजे.

या कार्यक्रमास राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष डॉ. अविनाश काशीवार, नगरपंचायतचे नगराध्यक्ष तेजराम मडावी, उपनगराध्यक्ष सौ. वंदनाताई डोंगरवार, महिला तालुकाध्यक्ष सौ. रजनीताई गिऱ्हेपुंजे यांच्यासह नगरसेवक देवचंद तरोने, महेंद्र वंजारी, गोपीभाऊ खेडकर, नगरसेविका सौ. दीक्षाताई भगत, शाहिस्ता शेख, डॉ. रीताताई लांजेवार, सायमा शेख आदी मान्यवर उपस्थित होते.

तसेच पत्रकार डॉ. भगत, राजेश मुनेश्वर, सुशील लाडे, बिरला गणवीर, सरपंच वडेगाव खोटोले, प्रल्हाद कोरे, उमेश गिरीपुंजे, डॉ. अविनाश यावलकर, अफरोश शेख, तसेच महिला पदाधिकारी प्रमिलाताई बडवाईक, पुष्पाताई गुप्ता, आनंद निखारे, रेखाताई लांजेवार, विमलताई गिरीपुंजे, रेखाताई मुनेश्वर, उषाताई होळकर यांच्यासह राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व मोठ्या संख्येने सडक अर्जुनी येथील नागरिक उपस्थित होते.

# गोंदिया जिल्ह्याला सिकलसेल मुक्त करण्यासाठी सज्ज व्हा!-पालकमंत्री ना.इंद्रनील नाईक




**गोंदिया :-**प्रजासत्ताक दिनाच्या ७७ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या "अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान' अंतर्गत गोंदिया जिल्हा सिकलसेल मुक्त करण्याचे आवाहन पालकमंत्री तथा राज्याचे उद्योग, सार्वजनिक बांधकाम, उच्च व तंत्रशिक्षण, आदिवासी विकास, पर्यटन, मदत व जलसंधारण मंत्री ना. इंद्रनील नाईक यांनी केले आहे.

२६ जानेवारी २०२६ रोजी पोलीस मुख्यालय मैदान, कारंजा, गोंदिया येथे आयोजित राष्ट्रध्वजारोहण समारंभात बोलताना त्यांनी हे आवाहन केले. या कार्यक्रमात जिल्ह्यातील प्रशासन, आरोग्य विभाग, विविध शासकीय अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ना. इंद्रनील नाईक म्हणाले की, सिकलसेल ॲनिमिया हा आजार विशेषतः आदिवासी व ग्रामीण भागात गंभीर स्वरूप धारण करत आहे. या आजाराचे वेळेवर निदान, समुपदेशन व उपचार केल्यास भविष्यातील पिढीला या आजारापासून मुक्त ठेवणे शक्य आहे. यासाठी शासनाच्या वतीने "अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियानफ प्रभावीपणे राबविण्यात येत असून, नागरिकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे त्यांनी सांगितले.

या अभियानाअंतर्गत सिकलसेल तपासणी, जनजागृती, उपचार व समुपदेशन यावर विशेष भर देण्यात येत आहे. प्रत्येक कुटुंबाने तपासणी करून घ्यावी, युवक-युवतींनी विवाहपूर्व तपासणीचे महत्त्व ओळखावे तसेच आरोग्य विभागाच्या मार्गदर्शनानुसार उपचार घ्यावेत, असे आवाहन त्यांनी केले.

पालकमंत्र्यांनी जिल्हा प्रशासन, आरोग्य विभाग, आशा सेविका, अंगणवाडी सेविका व स्वयंसेवी संस्थांचे या अभियानातील योगदानाबद्दल कौतुक केले. "सिकलसेल मुक्त गोंदिया" हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी शासन, प्रशासन आणि नागरिक यांचा समन्वय अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या प्रसंगी जिल्हाधिकारी प्रजित नायर (भा.प्र.से.), जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम.मुरुगानंथम, पोलीस अधीक्षक गोरख भामरे, जिल्हा परिषद अध्यक्ष लायकरामी भेंडारकर, उपाध्यक्ष सुरेशी हर्षे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभिजीत गोल्हार, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. पुरुषोत्तम पटले,सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अरविंदकुमार वाघमारे, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी विजय आखाडे, आयईसी विभाग प्रशांत खरात, जिल्हा साथरोग अधिकारी डॉ निरंजन अग्रवाल यांचे सह जिल्ह्यातील वरिष्ठ पोलीस अधिकारी, आरोग्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा देत पालकमंत्र्यांनी जिल्ह्याच्या आरोग्यदायी, समृद्ध व सिकलसेल मुक्त भविष्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न करावेत, असे आवाहन केले.

## जनतेच्या जीवाशी खेळणाऱ्या प्रशासनाविरुद्ध जि.प.सदस्य तरोणे यांचा एल्गार

### ३० जानेवारी रोजी रस्ता रोको आंदोलन

**गोदिया :-** नवरगाव (कला) ते कातुर्डी या रस्त्याची दुरवस्था आणि वारंवार होणारे जीवघेणे अपघात याकडे प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. अनेक निवेदने देऊनही सार्वजनिक बांधकाम विभाग झोपेचे सोंग घेत असल्याने, आता जनतेचा संयम सुटला आहे. या अन्यायाविरुद्ध आणि रस्ता मंजुरीनंतरही काम सुरू न करणाऱ्या कंत्राटदाराविरुद्ध जिल्हा परिषद सदस्या सौ. लक्ष्मी रविशंकर तरोणे यांच्या नेतृत्वात दिनांक, ३० जानेवारी २०२६ रोजी 'रस्ता रोकाO' आंदोलन छेडण्यात येणार आहे.



या रस्त्यावरील खड्डयांमुळे आजवर अनेकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. शालेय मुले, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांचे हाल होत आहेत. मरस्ता मंजूर असूनही काम का सुरू होत नाही? असा परखड सवाल सौ. तरोणे यांनी उपस्थित केला आहे. जोपर्यंत प्रत्यक्ष कामाला सुरुवात होत नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही, असा इशारा त्यांनी दिला आहे. या आंदोलनात परिसरातील शेकडो नागरिक आणि कार्यकर्ते सहभागी होणार आहेत. तरी लोकशाहीच्या या लढ्याला प्रसिद्धी देऊन जनतेचा आवाज पोहोचवण्यासाठी शासनापर्यंत आपण जनतेसोबत आंदोलन करण्याचा इशाराही जिल्हा परिषद सदस्य लक्ष्मी तरोने यांनी लेखी पत्र कार्यकारी अभियंता यांना दिला आहे.

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

# गोंदिया जिल्ह्यात "बिरसा हेल्थ कार्ड" अभिनव उपक्रमाचा शुभारंभ

## "आश्रमशाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यासाठी एक पाऊल निरोगी भविष्यासाठी"



**गोंदिया:-** राज्यात गोंदिया जिल्ह्यात प्रथमच आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी "बिरसा हेल्थ कार्ड' या अभिनव उपक्रमाचा शुभारंभ आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवन सभागृहात करण्यात आला.

"एक पाऊल निरोगी भविष्यासाठी–आश्रमशाळ–`तील प्रत्येक विद्यार्थ्यासाठी" या संकल्पनेतून एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प देवरी अंतर्गत हा उपक्रम प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येत आहे. या "बिरसा हेल्थ कार्ड'द्वारे आश्रमशाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी, आजारांची नोंद व संपूर्ण आरोग्यविषयक माहिती एकत्रित स्वरूपात उपलब्ध राहणार आहे. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत डॉक्टरांना विद्यार्थ्यांचा पूर्व वैद्यकीय इतिहास तत्काळ उपलब्ध होऊन अचूक व जलद उपचार करणे शक्य होणार आहे.

या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांमध्ये व पालकांमध्ये स्वच्छता, संतुलित आहार, व्यायाम, व्यसनमुक्ती तसेच विविध आजारांबाबत असलेले गैरसमज दूर करण्यासाठी जनजागृती करण्यात येणार आहे. महाराष्ट्रात प्रथमच आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी एकत्रित हेल्थ कार्ड उपलब्ध करून देण्यात येत असून, हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण आरोग्य विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

आश्रमशाळांमध्ये नर्स उपलब्ध झाल्यामुळे आरोग्यविषयक माहितीचे संकलन व जतन करणे अधिक सुलभ होणार आहे. आश्रमशाळ–`तील विद्यार्थी निवासी असल्याने व सिकलसेलसारख्या आजारांचे प्रमाण जास्त असल्याने, आजारपणाच्या वेळी वैद्यकीय इतिहास उपलब्ध नसतो. "बिरसा हेल्थ कार्ड'मुळे आता विद्यार्थ्यांची संपूर्ण आरोग्य माहिती सहज उपलब्ध होणार असून उपचारांमध्ये येणाऱ्या अडचणी दूर होणार आहेत.

या उपक्रमाचा अनावरण सोहळा जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवन सभागृहात पार पडला. यावेळी व्यासपीठावर जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर, सर्वश्री आमदार संजय पुराम, विनोद अग्रवाल, डॉ.मिलिंद नरोटे (गडचिरोली), जिल्हाधिकारी प्रजित नायर, पोलीस अधीक्षक गोरख भामरे, उपवनसंरक्षक पवनकुमार जोंग, प्रकल्प अधिकारी उमेश काशिद, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.तानाजी लोखंडे तसेच ङ्गबिरसा हेल्थ कार्डफ ज्यांच्या विशेष प्रयत्नातुन साकार झाले अशा सहाय्यक प्रकल्प अधिकारी डॉ.सायली चिखलीकर यांच्यासह विविध अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.हा उपक्रम आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांच्या निरोगी व उज्वल भविष्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे प्रकल्प कार्यालयामार्फत सांगण्यात आले.

# जिल्हाधिकारी प्रजित नायर यांच्या हस्ते ध्वजारोहण

**गोंदिया :-** जिल्हाधिकारी प्रजित नायर यांच्या हस्ते आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी परिविक्षाधीन आय.ए.एस. अधिकारी साईकिरण नंदाला, अपर जिल्हाधिकारी मिनाज मुल्ला, निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे, उपजिल्हाधिकारी मानसी पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी मुरलीनाथ वाडेकर यांचेसह विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.प्रारंभी पोलीस बॅन्ड पथकाच्या सुमधुर गायनाने राष्ट्रगीत व राज्यगीत सादर करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी सर्व उपस्थितांची भेट घेऊन प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

**तहसिलदार समशेर पठाण यांच्या हस्ते ध्वजारोहण**

तहसिलदार समशेर पठाण यांच्या हस्ते नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी जिल्हा उपनिबंधक अर्चना माळवे, जिल्हा माहिती अधिकारी अंजु कांबळे–निमसरकर, सर्वश्री नायब तहसिलदार प्रकाश तिवारी, जयंत सोनवाने, संजीव बारस–ागडे, बाबुलाल वरखडे यासह विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच माजी सैनिक, वकील, अर्जनवीस व स्थानिक नागररिक उपस्थित होते.याप्रसंगी तहसिलदार समशेर पठाण यांच्या प्रमुख उपस्थितीत बाल विवाह प्रतिबंध सामुहिक शपथ घेण्यात आली. तहसिलदार समशेर पठाण यांनी सर्व उपस्थितांची भेट घेऊन प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.



# मुनेश रहांगडाले यांचे संचालक पद कायम

**गोंदिया :-** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा पंचायत समितीचे सभापती मुनेश रहांगडाले यांच्याविरुद्ध दाखल करण्यात आलेली तक्रार पूर्णतः निराधार असल्याची स्पष्ट झाली आहे. या प्रकरणी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, गोंदिया यांनी तक्रार फेटाळून लावत मुनेश रहांगडाले यांचे संचालक पद कायम ठेवण्याचा आदेश दिला आहे.

कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक धनलाल बालचंद ठाकरे यांनी मुनेश रहांगडाले यांच्याविरुद्ध जिल्हा उपनिबंधकांकडे तक्रार दाखल केली होती. तक्रारीत रहांगडाले हे शेतकरी नसल्याचा तसेच त्यांच्या उत्पन्नाचा योग्य स्रोत नसल्याचा आरोप करत महाराष्ट्र कृषी उत्पन्न बाजार समिती नियम २०१७ मधील नियम १० (३) अंतर्गत त्यांचे संचालक पद रद्द करण्याची मागणी केली होती.

या तक्रारीवर सुनावणी करताना जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था गोंदिया अर्चना माळवे यांनी दोन्ही पक्षांचा सविस्तर युक्तिवाद ऐकून घेतला. सर्व कागदपत्रे, पुरावे व कायदेशीर बाबींचा अभ्यास केल्यानंतर त्यांनी स्पष्ट आदेश देत धनलाल ठाकरे यांनी दाखल केलेला तक्रार अर्ज फेटाळून लावला व मुनेश रहांगडाले यांचे संचालक पद कायम ठेवण्याचा निर्णय दिला. या प्रकरणात मुनेश राहांगडाले यांच्या वतीने अ‍ॅड. वाय. एम. पारधी यांनी प्रभावी व ठोस युक्तिवाद सादर केला. तसेच या प्रकरणात अ‍ॅड.पी. सी. चव्हाण व अ‍ॅड. विश्वनाथ रहांगडाले यांनी वे–ळोवेळी सहकार्य केले.

# शासनाचे पत्र धडकले, १९० ग्रा.प.वर प्रशासक राज

**गोंदिया :-** जिल्ह्यात नगरपरिषद–पंचायतीच्या, तसेच राज्यातील महानगरपालिका निवडणुकांचा रणसंग्राम आटोपला असून, सध्या जिल्हा परिषदेच्या निवडणुका घेतल्या जात आहेत. असे असतानाच मात्र ग्रामपंचायत निवडणुकांसाठी काही मुहूर्त मिळेना, अशी स्थिती झाली आहे. परिणामी जानेवारी ते डिसेंबर २०२६ का कालावधीत कार्यकाळ संपणाऱ्या किवा संपलेल्या ग्राम पंचायतीवर प्रशासक बसणार आहेत. त्यानुसार, जिल्ह्यात १९० गट ग्रामपंचायतींवर प्रशासकाराज येणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर राज्यात स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकांचा मुहूर्त निघाला आहे. सुमारे साडेतीन वर्षाच्या प्रशासकराजनंतर जिल्ह्यात नगरपरिषद–पंचायतीच्या निवडणुका आटोपल्या असून, लगेच महानगरपालिकेच्या निवडणुका घेण्यात आल्या आहेत. तर सध्या राज्यात जिल्हा परिषद निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. यामुळे या निवडणुका आटोपताच ग्राम पंचायतीच्या निवडणुका लागतील असे वाटत होते. मात्र, त्यासाठी निवडणूक आयोगाला मुहूर्त मिळेना, अशी स्थिती आहे.

यामुळेच जिल्ह्या–तील १९० गट ग्राम पंचायत निवडणुकीच्या प्रतीक्षेत आहेत; परंतु निवडणुकांसाठी काही मुहूर्त मिळत नसल्याने ग्राम विकास विभागाने जानेवारी ते डिसेंबर २०२६ या कालावधीत कार्यकाळ संपलेल्या किवा कार्यकाळ संपणाऱ्या ग्राम पंचायतवर प्रशासक नियुक्त करण्याचे आदेश काढले आ–हेत. यामुळे जिल्ह्यातील १९० ग्रामपंचायतींवरही प्रशासक नियुक्त केले जाणार आहेत.

**इच्छुकांचा झाला हिरमोड**

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने राज्य शासनाला स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका घेणे भाग पडले. यातूनच नगरपरिषद–नगरपंचायतीच्या निवडणुका सर्वप्रथम घेण्यात आल्या. त्यानंतर महानगरपालिकांच्या निवडणुका नुकत्याच आटोपल्या असून, सध्या जिल्हा परिषदेच्या निवडणुका सुरू आहेत. निवडणूक सत्र सुरू असल्याने आता ग्रामपंचायींचा नंबर लागणार हा विचार करून गावांमध्ये इच्छुकांनी आपली तयारी सुरू केली होती. मात्र, आता प्रशासक नियुक्त केले जाणार असल्याने निवडणुका कधी होतील, हे सांगणे कठीण दिसते. परिणामी इच्छुकांचा हिरमोड झाला आहे.

**तालुकानिहाय गटग्रामपंचायतींची संख्या**

| तालुका | ग्रामपंचायत |
|---|---|
| गोंदिया- | ३९ |
| तिरोडा- | १९ |
| देवरी- | ९ |
| अर्जुनी-मोरगाव- | २८ |
| गोरेगाव- | २५ |
| आमगाव- | २२ |
| सालेकसा- | २९ |
| सडक-अर्जुनी- | १९ |




# वनपरिक्षेत्राधिकारी वनक्षेत्र उत्तर देवरी यांचे कार्यालय

## कार्यालय-चिचगड रोड, देवरी

**कार्यालय-चिचगड रोड, देवरी, फोन नं.०७१९९ २२५०६५** email-rfonorthdeori@gmail.com

क्रमांक–वपअ/उदे/५८८/२०२५–२६ उत्तर देवरी दिनांक–१६–०१–२०२६

## निविदा सुचना (प्रथम वेळ)

**विषय–** जिल्हा वार्षिक योजना व आदिवासी उपयोजना (TSP) सन–२०२५–२६ अंतर्गत वनक्षेत्रातील दगळीचे डॅम बांधणे TSP TC020013 (53 बांधकाम) व वनसंरक्षणांची मंजूर कामे करण्याकरिता प्रपत्र ब–१ मध्ये निविदा सादर करणेबाबत.

उपरोक्त विषयान्वये उत्तर देवरी वनपरिक्षेत्रातील जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना (TSP) सन–२०२५–२६ अंतर्गत खालील प्रपत्रात दिलेली कामे करणेकरीता सुशिक्षीत बेरोजगार अभियंता, मजूर कामगार सहकारी संस्था व पंजीकृत कंत्राटदार यांचेकडून मोहरबंद टक्केवारी निहाय निविदा प्रपत्र ब–१ मध्ये निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | बिटाचे नाव | कागाचे नाव | कक्ष क्र. | संख्या | अंदाजपत्रकीय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Purada-1 | Construction of Gabian Bhandara Purada No.1,2,3,4,5 | 577 | 5 | 982319/- | सुशिक्षीत बेरोजगार अभियंता यांना प्रथम प्राधान्य |
| 2 | Purada-2 | Construction of Gabian Bhandara Purada No.6,7,8,9,10 | 577 | 5 | 984848/- | सुशिक्षीत बेरोजगार अभियंता यांना प्रथम प्राधान्य |
| 3 | Purada-03 | Construction of Gabian Bhandara Purada No.9,10,11,12 | 66 | 4 | 980712/- | मजुर कामगार सहकारी संस्था |
| 4 | Purada-03 | Construction of Gabian Bhandara Purada No.5,6,7,8 | 65 | 4 | 980411/- | मजुर कामगार सहकारी संस्था |
| 5 | Murpar To | Providing Chainlink Fenching Work to Premisses Navatola check Post Naka in North Deori Range | 545 | 1 | 894000/- | पंजीकृत कंत्राटदार |

१. कामपूर्ण करावयाचा कालावधी :– ६० दिवस
२. निविदा जारी करण्याची तारीख :– ३०.०१.२०२६
३. निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख :–०४.०२.२०२६
४. निविदा स्विकारुन उघडणाऱ्या अधिकाऱ्याचा पद व हुद्दा :– वनपरिक्षेत्राधिकार उत्तर देवरी.
५. निविदा उघडण्याची तारीख :–०६.०२.२०२६
६. निविदा मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्याचा पद व हुद्दा :– उपवनसंरक्षक गोंदिया वनविभाग गोंदिया

अटी व शर्ती :–

७. कंत्राटदार सार्वजनिक बांधकाम/जि.प.बांधकाम विभाग गोंदिया विभागाद्वारे नोंदणीकृत असावा. त्यांचे स्वत:चे पॅनकार्ड GST रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र तीन वर्षाचे ईन्कम टॅक्स रिटर्न फाईल केल्याचे प्रमाणपत्र, पी.टी. प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे.
८. वनपरिक्षेत्र कार्यालय उत्तर देवरी येथे मोहोरबंद केलेल्या बॉक्समध्ये परिपूर्ण भरलेली निविदा प्रपत्र सादर करणे बंधनकारक आहे.
९. निविदा वनपरिक्षेत्र अधिकारी वनक्षेत्र उत्तर देवरी यांच्या कार्यालयात निविदा उघडण्याच्या दिवशी शक्यतो सकाळी ११.०० वा. इच्छुक निविदाधारक अथवा प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.
१०. निविदा उघडल्यानंतर मा.उपवनसंरक्षक गोंदिया यांचेकडे मंजुरीस्तव सादर करण्यात येईल.
११. कोणतेही कारण न दर्शविता कोणतीही एखादा अथवा सर्व निविदा मधील एखादी बाब फेटाळण्याचा अधिकार सक्षम अधिकाऱ्यास राखून ठेवला आहे.
१२. केंद्र शासनाच्या दि.०१.०७.२०१७ चे परिपत्रकानुसार CGST व SGST दोन्ही मिळून २ टक्के कपात करण्यात येईल. तसेच इतर शासकीय नियमानुसार करांचे कपाती करण्यात येतील, याशिवाय आयकर, सुरक्षा ठेव व व इतक करांची कपात करण्यात येईल.
१३. कामाचा तपशिल व तांत्रीक मार्गदर्शन वनपरिक्षेत्र अधिकारी उत्तर देवरी यांच्या कार्यालयातून कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल.
१४. काम सुरु असतांना व काम पूर्ण झाल्यावर यंत्रणाचे अधिकारी तसेच त्रयष्य संस्थेमार्फत मूल्यमापन करण्यात येईल. त्याअनुषंगाने कंत्राटदाराचे सहकार्य करणे आवश्यक आहे. अन्यथा देयके पारीत करण्यात येणार नाही.
१५. वरीष्ठ कार्यालयाकडून वेळोवेळी प्राप्त होणारे निर्देश कंत्राटदारांना पाळावा लागेल.

**(एस.व्ही.धोटे-मिश्रा)**
**वनपरिक्षेत्र अधिकारी**
**उत्तर देवरी वनक्षेत्र**

जिमाका/गों/जाहि/११९/२०२५

साप्ताहिक बेरार टाईम्स निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक http://berartimes.com बुधवार,दि.२८ जानेवारी २०२६ ४

# गडचिरोली पोलीस दलातील ३१ पोलिसांना शौर्यपदक जाहीर



**गडचिरोली :-** सन २०१८ मध्ये इंद्रावती नदीलगत बोरिया-कसनासूरच्या चकमकीत गडचिरोली पोलिसांच्या सी-६० पथकाने दोन दिवसात ४० माओवाद्यांना कंठस्नान घातले होते. त्या शौर्यपूर्ण कामगिरीसाठी गडचिरोली पोलीस दलातील अधिकारी आणि अंमलदार मिळून ३१ जणांना राष्ट्रपतींकडून शौर्यपदक जाहीर करण्यात आले. याशिवाय प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला एकूण ३९४ पोलीस अंमलदारांना पदोन्नती देण्यात आली. तसेच १० शहीद अंमलदारांना देखील पद-ोन्नती मिळाली.

देशभरामध्ये पोलीस दलात किंवा इतर सशस्त्र दलात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या पो-लीस अधिकारी व अंमलदारांना प्रजासत्ताक दिनानिमित्त शासनाकडून सन्मानित केले जाते. यावर्षी सुद्धा २५ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंधेला राष्ट्रपतींच्या कार्यालयाने संपूर्ण देशभरात एकूण १२१ पोलिसांना शौर्य पदक जाहीर केले. त्यापैकी गडचिरोली पोलीस दलातील ३१ जणांना समावेश आहे.

सन २०२५ मध्ये स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला ७ पोलीस अधिकारी व अंमलदारांना राष्ट्रपती यांचे पोलीस शौर्यपदक प्राप्त झाले होते. यावर्षी सन २०२६ मध्ये एकुण ३१ पोलीस अधिकारी व अंमलदारांना राष्ट्रपती यांचे पोलीस शौर्य पदक जाहिर झाले आहे. मागील पाच वर्षात गडचिरोली पोलीस दलास एकूण ३ शौर्य चक्र, २१७ पोलीस शौर्य पदक प्राप्त झाले आहे.

**हे आहेत पदकप्राप्त अधिकारी व कर्मचारी**

पोलीस शौर्यपदक प्राप्त अधिकाऱ्यांमध्ये पोलीस निरीक्षक अमोल फडतरे, सहायक पो.निरीक्षक मधुकर पोचय्या नैताम, पोलीस उपनिरीक्षक वासुदेव मडावी, एएसआय विलास मारोती पोरतेट हवालदार संतोष नैताम, विश्वनाथ सन्यासी सडमेक, ज्ञानेश्वर सदाशिव तोरे, दिलीप वासुदेव सडमेक, रामसू देऊ नरोटे, आनंदराव बाजीराव उसेंडी, राजू पंडीत चव्हाण, मोहन लच्छु उसेंडी, संदीप गणपत वसाके, नायक अरुण कैलास मेश्राम, सुधाकर वेलादी, नितेश गंगाराम वेलादी, विश्वनाथ लक्ष्मण मडावी, कैलास देवू कोवासे, हरीदास महारु कुलयेटी, किशोर चंटी तलांडे, अतुल भगवान मडावी, अनिल रघुपती आलाम, नरेंद्र दशरथ मडावी, आकाश अशोक ऊईके, घिस्सु वंजा आत्राम, राजु मासा पुसाली, महेश दत्तुजी जाकेवार, रुपेश रमेश कोडापे, मुकेश शंकर सडमेक, योगेंद्रराव सडमेक, तसेच अंमलदार कारे ईरपा आत्राम यांना पोलीस शौर्य पदक जाहीर करण्यात आले.दि.२२ एप्रिल २०१८ रोजी बोरीया-कसनासूर ही गाजलेली चकमक झाली होती. सर्व अधिकारी व अंमलदारांनी या चकमकीमध्ये केलेल्या यशस्वी कामगिरीची दखल घेऊन राष्ट्रपती कार्यालयाने पोलीस शौर्य पदक जाहीर केले आहे.

**३९४ अंमलदारांना पदोन्नती**

यासोबतच गडचिरोली पोलीस दलातील एकूण ३९४ पोलीस अंमलदारांना पदोन्नती मिळाली आहे. त्यापैकी १० पोलीस अंमलदारांना वेगवर्धित पद-ोन्नती, तसेच १४ शहीद पोलीस अंमलदारांना देखील पदोन्नती मिळाली आहे. यामध्ये एकूण ८२ पोलीस हवालदारांना सहाय्यक पोलीस उप-निरीक्षकपदी पद-ोन्नती देण्यात आलील. ९ पोलीस हवालदार यांना वेगवर्धित पद्धतीने पदोन्नती मिळाली आहे. तसेच ३०२ पोलीस नाईक यांना पोलीस हवालदारपदी बढती मिळाली. एका पोलीस नाईकला वेगवर्धित पद-ोन्नती मिळाली आहे. यासोबतच ७ शहीद पोलीस हवालदारांना सहा.पोलीस उपनिरीक्षकपदी तर ७ शहीद पोलीस नाईक यांना पोलीस हवालदारपदी पदोन्नती देण्यात आली आहे.

राष्ट्रपती पोलीस शौर्यपदक प्राप्त पोलीस अधिकारी व अंमलदार, तसेच पदोन्नतीप्राप्त पोलीस अंमलदारांचे गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने पोलीस अधीक्षक नीलोत्पल, अपर पोलीस अधीक्षक (अभियान) एम.रमेश, अपर पो-लीस अधीक्षक (अहेरी) कार्तिक मधीरा व अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) गोकुल राज जी यांनी कौतुक केले.

# “मिशन २०२७ स्वतंत्र विदर्भ राज्य” लाँगमार्च-माजी आमदार वामनराव चटप



**गोंदिया :-** कर्जाच्या बोझ्याखाली दबलेले राज्य सरकार विदर्भातील सिंचन, शेतकरी आत्म हत्या, कुपोषण, माता-बालमृत्यू, बेरोजगारी आदी जटील प्रश्न १०० वर्षे विदर्भ महाराष्ट्रात राहिला तरी सोडवू शकत नाही. यावर उपाय म्हणजे विदर्भ स्वतंत्र राज्य होणे हे आहे. याकरिता आता आरपारची लढाई लढली जाईल. ङ्गमिशन २०२७ स्वतंत्र विदर्भ राज्यफ डोळ्यासमोर ठेऊन २२ फेब्रुवारी रोजी नागपुरात लाँगमार्च काढण्यात येईल, असे विदर्भ राज्य आंदोलन समितीचे अध्यक्ष माजी आमदार वामनराव चटप यांनी सांगितले.

येथील शासकीय विश्रामगृहात शनिवारी (ता. २४) आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. पत्रकार परिषदेला विदर्भ प्रदेश युवा आघाडीचे मुकेश मासुरकर, पूर्व विदर्भ अध्यक्ष अरुण केदार, उपाध्यक्ष सुनील चोखारे, जिल्हाध्यक्ष छैलबिहारी अग्रवाल, डॉ. रमेश गजबे, सी. पी. बिसेन, विजया ओझा, दीपा काशीवार यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

पत्रकार परिषदेत बोलताना माजी आमदार ॲड. वामनराव चटप पुढे म्हणाले, स्वतंत्र विदर्भ राज्य मिळिवण्याकरिता २०२७ ची डेडलाइन घेऊन विदर्भ राज्य समिती सातत्याने प्रयत्न करीत आहे. विदर्भाची मागणी विदर्भाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचविण्याकरिता विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या वतीने २०२५ अखेरपर्यंत सहा जनसंकल्प मेळावे घेतले गेले. त्यात मेळघाटसारख्या अतिदुर्गम भागाचा समावेश होता. कारंजा लाड-गडचिरोली-गोंदिया-अमरावती (बडनेरा) व भंडाऱ्यातील जनतेचा सहभाग वाखाणण्याजोगा होता.

महाराष्ट्र राज्य दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर असल्याचे सांगत माजी आमदार चटप म्हणाले, राज्याचे महसुली उत्पन्न पाच लाख ६० हजार ९६३ कोटी रुपये आहे. राज्य सरकारला वर्षांच्या खर्चाकरिता सहा लाख सहा हजार ८५५ कोटी रुपये लागणार असून राज्याचा अर्थसंकल्प ४५ हजार कोटी रुपये तुटीचा आहे. याशिवाय राज्यावर ३१ मार्च २०२५ रोजी सात लाख ३२ हजार कोटींचा कर्जाचा डोंगर आहे. त्यावर द्यावे लागणारे व्याज हे ५६ हजार ७२७ कोटी रुपये आहे. राज्य सरकारने बजेट मंजूर झाल्यानंतर जून २०२५ मध्ये १३ हजार कोटी रुपयांचे कर्ज घेतले असून परत एक लाख ३२ हजार कोटी रुपयांचे कर्ज घेण्यास केंद्र सरकारला परवानगी मागितली आहे. त्यापैकी फक्त ५३ हजार कोटी रुपये कर्ज घेणे बाकी राहिले आहे.

आज कर्जाचा डोंगर नऊ लाख ३० हजार कोटीवर गेला असून घेणे असलेले ५३ हजार कोटी रुपये कर्ज प्रत्यक्ष घेतल्यानंतर राज्यावरील कर्जाचा डोंगर व व्याजाचा भार (बोझा) एकूण नऊ लाख ८३ हजार ७२७ कोटी रुपये होणार आहे. याशिवाय राज्य सरकारला दहा महिन्यांपूर्वी कामे केलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कंत्राटदारांचे ४० हजार कोटी, जलसंधारण व जलसिंचनाच्या कंत्राटदारांचे १३ हजार कोटी, जलजीवन मिशनच्या कंत्रटदारांचे १२ हजार कोटी रुपये, ग्रामविकास विभागाच्या विशेष सोयी व सुधारणा केलेल्या कंत्राटदारांचे १८ हजार कोटी रुपये, नगरविकास खात्याच्या कंत्राटदारांचे चार हजार कोटी रुपये, ग्रामीण भागातील विशेष सुधारणा व केलेल्या बांधकामाचे कंत्राटदारांचे सहा हजार कोटी रुपये, जिल्हा विकास निधीच्या कामाच्या कंत्राटदारांचे दोन हजार ५१६ कोटी रुपये असे एकूण देणे असलेली रक्कम ९५ हजार ७३२ हजार कोटी रुपये आहे.

कर्जाच्या बोझ्याखाली राज्य सरकार पूर्णतः दबले असून, विदर्भाचा नागपूर कराराप्रमाणेचा सिंचनाचा अनुशेष व इतर क्षेत्राचा अनुशेष कदापी भरून काढू शकत नाही. त्यामुळे विदर्भातील धरणे, कालवे बांधून १४ लाख हेक्टर शेतजमीन सिंचनाखाली आणू शकत नाही. विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबू शकत नाही, कुपोषणामुळे होणारे माता-बालमृत्यू, स्तनदा मातामृत्यू थांबवु शकत नाही. बेरोजगारांच्या रोजगाराचा प्रश्न मिटवू शकत नाही. याकरिता स्वतंत्र विदर्भ राज्य होणे गरजेचे आहे. याच मागणीकरिता २२ फेब्रुवारी रोजी नागपुरात लाँगमार्च काढण्यात येणार आहे.

## असा असेल लाँगमार्चचा मार्ग

**दुपारी १२ वाजता विदर्भ निर्माण जनसंकल्प लाँगमार्चची सुरवात विदर्भ चंडिका मंदिर शहीद चौक इतवारी येथून होणार आहे. टांगा स्टॅण्ड चौक-नंगा पुतळा चौक- डागा चौक-अग्रसेन चौक ते रूईकर चौकापर्यंत लाँगमार्च जाईल. त्यानंतर दुपारी चिटणीस पार्क येथे जाहीर मेळावा होईल.**

# अतिदुर्गम बिनागुंडा गावात नवीन पोलीस मदत केंद्राची स्थापना

**गडचिरोली:-** जिल्ह्यातील माओवाददृष्ट्या अतिसंवेदनशील व अतिदुर्गम भागातील नागरिकांची सुरक्षा व सर्वांगीण विकास सुनिश्चित करण्यासाठी उपविभाग भामरागड अंतर्गत बिनागुंडा येथे नवीन पोलीस मदत केंद्राची स्थापना करण्यात आली.

अवघ्या २४ तासांत सुमारे १०५० मनुष्यबळ, सी-६० कमांडो, बीडीडीएस पथके, विशेष पोलीस अधिकारी व यंत्रसामग्रीच्या मदतीने हे पोलीस मदत केंद्र उभारण्यात आले.




या केंद्राचे उद्घाटन मा. विशेष पोलीस महानिरीक्षक (नक्षलविरोधी अभियान) संदीप पाटील, पोलीस उप-महानिरीक्षक अंकित गोयल, पोलीस अधीक्षक नीलोत्पल, सीआरपीएफ कमांडंट शंभु कुमार यांच्या उपस्थितीत पार पडले.

या पोलीस मदत केंद्रामुळे अतिदुर्गम भागात जलद सुरक्षा, प्रशासनाचा थेट संपर्क, विकासकामांना गती मिळणार असून सन २०२३ पासून सुरक्षा पोकळी कमी करण्याच्या साख-ळीतील हे १० वे पोलीस मदत केंद्र ठरले आहे.

उद्घाटनप्रसंगी जनजागरण मेळाव्याचे आयोजन करून स्थानिक नागरिकांना विविध जीवनोपयोगी साहित्याचे वितरण करण्यात आले. वाढलेल्या सुर-क्षेमुळे भविष्यात राष्ट्रीय महामार्ग, मोबाईल टॉवर, एस.टी. बस सेवा यांसारख्या विकासकामांना चालना मिळणार आहे.

# विद्यार्थ्यांच्या कल्पकतेतून आयोजित तंत्रप्रदर्शनीचे कौतुक-आमदार अग्रवाल

**गोंदिया :** विद्यार्थ्यांच्या कल्पकतेतून आयोजित तंत्रप्रदर्शनीचे कौतुक आमदार विनोद अग्रवाल यांनी केले. कौशल्य रोजगार व उद्योजकता व नाविन्यता विभाग व्यवसाय क्षिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या वतीने जिल्हास्तरीय तंत्रप्रदर्शनीचे आयोजन महर्षि अरविंद शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था गोंदिया येथे करण्यात आले, त्यावेळी श्री. अग्रवाल उद्घाटक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी आर.बी. गणवीर होते. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतुन विविध मॉडेल्स तयार करुन आणले होते.

# वनसंवर्धन व संरक्षण कार्यात उत्कृष्ठ कार्याबद्दल नवाटोला वन व्यवस्थापन समितीचा गौरव



**सालेकसाः** सालेकसा वनपरिक्षेत्रातील वन व्यवस्थापन समिती नवाटोलास वनव्यवस्थापनासह वनसंरक्षण व संवर्धन कार्यात उत्कृष्ठ कार्य केल्याबद्दल २६ जानेवारीला ७७ व्या प्रजासत्ताकदिनी सालेकसा वनपरिक्षेत्र कार्यालयाच्यावतीने प्रश-स्तीपत्र देऊन गौरवण्यात आले. नवाटोला वनपरिसरात ५ जानेवारी २०२६ रोजी छत्तीसगड येथील लाकुड तस्कर सागवान लाकडाची कापणी करुन बिट क्रमांक ८१८मधून वाहतूक करीत असतांना वनव्यवस्थापन समितीच्या जागृत सदस्यानी गुप्त माहितीच्या आधारे धाड घालून ५ वनतस्करांना वनविभागाच्या स्वाधिन केले होते.त्यांनी केलेल्या या कार्याची दखल गोंदिया वनविभागाचे उपवनसरंक्षक पवनकुमार जोंग,सहाय्यक वनसरंक्षक सचिन डोंगरवार यांनी घेत त्यांच्या या कार्याबद्दल प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्याचा निर्णय घेतला.त्या अनुषंगाने २६ जानेवारीला सालेकसा येथील वनपरिक्षेत्र कार्यालयात वनपरिक्षेत्र अधिकारी रमेश घुंटके यांच्याहस्ते नवाटोला वनव्यवस्थापन समितीच्या सदस्यासह नवाटोला क्षेत्र सहाय्यक बी.ए.कोहरे,क्षेत्र सहाय्यक एस.वाय.चव्हाण,वनरक्षक एस.के.बागडे,गणेश पाऊलझगडे,किशोर फुंडे,विनोद भेंडारकर,सुरेश पटले, व प्रदिप भांडारकर यांना प्रशस्तीपत्र देत गौरवण्यात आले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता क्षेत्रसहाय्यक एस.एम .पवार,जे.जी. खान,से.स.बनोठें,तुरकर व इतर कर्मचा-यांनी सहकार्य केले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्व. जयंतीच्या अध्यक्ष पदी अरविंद भावे यांची वर्णी

**गोंदिया:-** डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती २०२६ च्या अध्यक्षपदी अरविंद भावे यांची निवड झाली आहे.श्री भावे हे बँकेचे सेवानिवृत्त अधिकारी आहेत.दरम्यान गोंदियाच्या रिंगरोडवरील अशोक कांबळेच्या कार्यालय परिसरात २६ जानेवारी रोजी जयंती समितीच्या सभेत अध्यक्ष पदासाठीची निवड करण्यात आली आहे.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जयंतीचे माजी अध्यक्ष विलास वासनिक हे होते. मंचावर निवर्तमान अध्यक्ष अनंत टेम्भूरकर,नरेंद्र मेश्राम ,सुनील भरणे,श्रीमती पौर्णिमा रंगारी, श्लेषा लाडे, वीणा चव्हाण, नानाजी शेंडे, श्री तांडेकर, अशोक कांबळे, श्री देशमुख, आदी मान्यवर उपस्थित होते.ही निवडणूक अत्यंत चुरशीची झाली. अध्यक्ष पदासाठी अरविंद भावे,सुनील मेश्राम, जोगेंद्र गजभिये, एन. एल. मेश्राम आणि पंकज ना-गदवने यांच्या नावाला कार्यकर्त्यांकडून अनुमोदीत करण्यात आलं.

# १०८ रुग्णवाहिका ठरली दोन लाख रुग्णांची जीवनदायिनी



**गोंदिया :-** आपत्कालीन परिस्थितीत वैद्यकीय सेवा जलद मिळावी, यासाठी जिल्ह्याकरिता सार्वजनिक आरोग्य विभागाने १ मार्च २०१४ पासून ‘१०८’ या आपत्कालीन रुग्णवाहिकेची सेवा सुरू केली आहे. डिसेंबर २०२५ पर्यंत तब्बल एक लाख ९९ हजार ३९६ रुग्णांनी या सेवेचा लाभ घेतला आहे. म्हणूनच, म१०८फ रुग्णवाहिका एक लाख ९९ हजार ३९६ रुग्णांची जीवनदायिनी ठरली आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान व आरोग्य विभाग यांच्या सहकार्याने १ मार्च २०१४ पासून जिल्ह्यात ‘१०८’ ही आपत्कालीन रुग्णवाहिका सेवा सुरु झाली आहे.

अगदी निःशुल्क तत्त्वावर दिल्या जाणाऱ्या सेवेमुळे अपघातग्रस्त, बाळंतपणासाठी अडलेल्या महिला, विषबाधेसह इतर सर्वच प्रकारची वैद्यकीय मदत नागरिकांना वेळेत पोहोचू शकत आहे. डिसेंबर २०२५ पर्यंत एक लाख ९९ हजार ३९६ रुग्णांनी लाभ घेतला आहे.

तर यातूनच अनेकांना नवजीवन देण्याचे काम साध्य झाले आहे. १०८ क्रमांकावर कॉल केल्यास अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणांनी सज्ज अस-लेली रुग्णवाहिका रुग्णांच्या सेवेसाठी सुवर्णकाळात हजर होत आहे.

रुग्णवाहिकेतील यंत्रांच्या साहाय्याने मगोल्डन अवर्सफमध्ये रुग्णांना रुग्णालयात भरती करण्यापूर्वी आवश्यक उपचार मिळतात. त्यामुळे घटनास्थळापासून रुग्णालयापर्यंत रुग्णांना स्वस्थता लाभत आहे. मजीपीआरएसफ प्रणालीमुळे कॉल आल्यास संबंधित डॉक्टरांना कळवून रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल होते.

## असे चालते ‘१०८’चे काम

**रुग्ण अथवा इतर कोणाकडून १०८ क्रमांकावर कॉल केल्यास तो क्रमांक कुठला ते शोधले जाते. त्याचवेळी मजीपीएसफच्या मदतीने त्या भागात कोणते रुग्णालय आहे, हे पाहून तेथील ग्रामीण, उपजिल्हा रुग्णालय अथवा प्राथमिक आरोग्य केंद्राला माहिती दिली जाते. त्यानंतर रुग्णवाहिका रुग्णापर्यंत कमीत कमी वेळेत पोहोचेल, याकडे लक्ष दिले जाते.**

## १५ रुग्णवाहिकांद्वारे वैद्यकीय सेवा

**या योजनेंतर्गत जिल्ह्यात १५ अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणांनी सज्ज रुग्णवाहिका कार्यरत आहेत. या रुग्णवाहिका सध्या केटीएस सामान्य जिल्हा रुग्णालय, बाई गंगाबाई स्त्री रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय तिरोडा, ग्रामीण रुग्णालय देवरी, ग्रामीण रुग्णालय आमगाव, ग्रामीण रुग्णालय सडक-अर्जुनी, ग्रामीण रुग्णालय अर्जुनी-मोरगाव, ग्रामीण रुग्णालय नवेगावबांध, ग्रामीण रुग्णालय गोरेगाव, ग्रामीण रुग्णालय सौंदड, ग्रामीण रुग्णालय चिचगड, ग्रामीण रुग्णालय सालेकसा, ग्रामीण रुग्णालय रजेगाव, प्राथमिक आरोग्य केंद्र एकोडी, प्राथमिक आरोग्य केंद्र डव्वा येथे कार्यरत आहेत.**

# आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांशी आदिवासी विकास मंत्र्यांनी साधला संवाद

**गोंदिया:** राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके हे गुरुवारी जिल्ह्याचे दौऱ्यावर असतांना त्यांनी शासकीय आदिवासी माध्यमिक तथा उच्च माध्यमिक आश्रम शाळा, शेंडा येथे अचानक भेट दिली. यावेळी मंत्री श्री. उईके यांनी शाळेतील विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधत शाळेत दिला जाणारा पोषण आहार, विद्यार्थ्यांच्या आरोग्य सुविधा तसेच पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेबाबत सविस्तर माहिती जाणून घेतली.या भेटीदरम्यान मंत्री श्री. उईके यांच्यासमवेत आमदार मिलिंद नरोटे (गडचिरोली), एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प देवरीचे प्रकल्प अधिकारी उमेश काशिद व इतर उपस्थित होते.

# ने.हि.कॉलेज ब्रम्हपुरीच्या १९९५ ते ९८ बॅच विद्यार्थ्यांचा २७ वर्षानंतर स्नेहमिलन सोहळा



महाविद्यालयाचे दिवस संपले की,प्रत्येकजण आपल्या करियरसाठी वेगवेगळ्या क्षेत्राकडे धाव घेत-ो.मात्र ज्या महाविद्यालयात आपण शिकलो,घडलो,वेगवेगळ्या भागातील विद्यार्थ्यांबरोबर आपण मैत्रीचे नाते जोडले,ती नाळ मात्र तशीच असते.पुन्हा एकदा भेटावे,सर्वांशी हितगुज करावे असे सर्वांनाच वाटते.पण प्रत्येकजण आपआपल्या नोकरी-धंद्यात,संसारात व्यस्त असल्यामुळे ते सहजासहजी शक्य होत नाही.मात्र ते अशक्यही नसते. ज्या महाविद्यालयात आपण घडलो,आयुष्य जगण्याचे तंत्र-मंत्र मिळाले,त्या महाविद्यालयातील १९९५ ते १९९८ बॅचचे विद्यार्थी मित्र-मैत्रिणीसोबत पुन्हा २७ वर्षानंतर एक डाव पुन्हा मांडण्याची, भेटण्याची संधी चालून आली. ती म्हणजे या स्नेह मिलन सोहळ्यामुळे.

कार्यक्रमाची सुरुवात एकमेकांना पुष्पगुच्छ देऊन व केक कापून उपस्थितांचे स्वागत करण्यात आले. जवळपास सत्तावीस वर्षानंतर काही मित्र मैत्रिणी एकमेकांना भेटत होते. वातावरण सर्व भावूक झाले होते.स्नेहमिलन सोहळ्याचा मुख्य उद्देश म्हणजे एकमेकाप्रति आपुलकी, स्नेह व एकात्मतेची भावना निर्माण करणे हा होता. या निमित्ताने अनेक वर्षांनंतर भेटलेल्या मित्र-मैत्रिणींनी आपल्या कॉलेज जीवनातील आठवणींना उजाळा दिला.मागील काही वर्षांपासून नेवजाबाई हितकारिणी कॉलेज ब्रम्हपुरीच्या वर्गातील मित्र -मैत्रिणींचा सदैव दरवळणारी मैत्री या व्हाट्स अँप ग्रुप मधून एकमेकांशी संपर्क येत होता. अशातच सर्वांनी एकत्र येऊन कुठेतरी भेटून कॉलेजातील आठवणींना उजाळा द्यावा अशी इच्छा व्यक्त केली.त्याला सर्व मित्र-मैत्रिणींनी सकारात्मक प्रतिसाद देत गोंदिया जिल्ह्यातील नवेगावबांध अभयारण्यातील निसर्गाच्या सानिध्यात असलेल्या तल-ावाशेजारील परिसरात स्नेहमिलन सोहळा २५ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आला.हळूहळू सर्व मित्र-मैत्रिणी एकत्र गोळा झाल्यानंतर प्रत्येकाने आपली ओळख करून दिली.आठवले कॉलेजातील ३० हुन अधिक विद्यार्थी, माजी वर्गमित्र यावेळी एकत्र येऊन नव्या-जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. सर्वांनी एकमेकांशी मनमुराद गप्पा करून नव्या-जुन्या आठवणींना उजाळा देत एकमेकांच्या परिवाराविषयी,कामकाजाविषयी व सध्या आपल्या आयुष्यात काय चालल आहे हे एकमेकांना सांगतांना गप्पा रंगत गेल्या.

या स्नेहमिलन सोहळ्याचा आयोजक असलेला वर्गमित्र यशपाल कर्हाडे म्हणाले की,आज आमच्या मित्र-मैत्रिणीकडे बघितले तर २७ वर्षानंतर ते चेहरे दिसले आणि जुन्या आठवणी जाग्या झाल्या. आयुष्यातले सर्व क्षण आठवणीत राहतात असे नाही,पण काही क्षण असे असतात की,जे विसरू म्हण-ताही विसरता येत नाही.आपण वयाने कितीही मोठे झालो किंवा आपापल्या क्षेत्रात कितीही यशस्वी झालो तरी कॉलेजचे ते सोनेरी दिवस आपण कधीच विसरू शकत नाही.पण वेळ कुणासाठी थांबत नाही आणि मागे पडलेले दिवस पुन्हा येत नाही.पण ह्या सर्व आठवणी अमर असतात. इतक्या वर्षानंतरही कॉलेजमधील आठवण करून मन व्याकुळ करून सोडतो. तरुणपणा-तील मैत्री ही अवखळ, उनाड,परिपक्व तरीही सतत हवीहवीशी वाटणारी असते.कॉलेज विश्व आणि मित्रपरिवार हे एकमेकांशिवाय अधुरे आहेत. आजच्या या स्नेहमीलन सोहळ्यात या सर्व मित्र-मैत्रिणी सोबत जगलेले सोबतचे हे दिवस अजूनही प्रत्येकांना वाटत असेल की ही भेट फारच छोटी होती.

या स्नेहमिलन सोहळ्याला राजेश चौधरी,राकेश तलमले,अविनाश डेकापूरवार,मोरेश्वर दर्वे,सुरेश राऊत,अझहर शेख ब्रह्मपुरी,सचिन घाटबांधे,खेमेंद्र कटरें गोंदिया,यशपाल कऱ्हाडे साकोली,संदीप नक्षलवार मुंबई,खेमराज पुस्तडे नवेगाव बांध,प्रीतम रामटेके भंडारा,अनिल वैद्य,विनोद दिघोरे पवनीं,अनिल मातेरे,अमर दोनाडकर,सोनाली रायपुरे सहारे ब्रह्मपुरी, भावना करंडे खरवडे वर्धा ,सीमा दलाल बावणे,कविता धकाते खांडेलकर,सीमा आमले नागपूर,नीता भेदे भुसारी वरोरा,ज्योती हजारे नवघडे ब्रह्मपुरी, ज्योती कुथे नागभीड, विकास कऱ्हाडे नागपूर,ऋषी दिघोरे,राहुल कुथे ब्रह्मपुरी, श्रुती डांगे नागपूर, हितेंद्र नाकतोडे मुंबई, नितीन बनसोडे वडसा, वनिता मांडीवर गडचिरोली,आशिष भुरले,सचिन भूपाल ब्रह्मपुरी,ललिता मेश्राम चंद्रपूर, विनय कोराने, निशांत बुरले ब्रह्मपुरी,प्रकाश सोनवाने गोरेगाव, राजु तुपट ब्रह्मपुरी, चंद्रकांत सूर्यवंशी या मित्र मैत्रिणींची उपस्थिती विशेष होती.

या प्रसंगी ट्रॉफी देऊन सर्वांचा सन्मान व कौतुक करण्यात आले. सर्वांनी आयोजकांचे मनःपूर्वक आभार मानले आभार मानले. स्नेहमिलन सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांमधील मैत्रीचे नाते अधिक दृढ झाले. हा सोहळा सर्वांच्या स्मरणात राहील, असा अभिप्राय उपस्थितांनी व्यक्त केला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजक यशपाल कऱ्हाडे व खेमराज पुस्तडे तसेच उपस्थित सर्वांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नीता भेदे यांनी केले.व शेवटी निरोप समारोप कवयित्री ज्योती हजारे व सोनाली रायपुरे-सहारे यांच्या कवितेने झाला.

# गाळमुक्त धरण योजनेच्या कामाची गती वाढवा-परिणय फुके




**गोंदिया :-** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील गाळमुक्त धरण जलयुक्त शिवार योजना जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत १३१ गाळ काढण्याची कामे मंजूर करण्यात आली होती. त्यापैकी आतापर्यंत केवळ ४९ कामे पूर्ण झाली आहे. कामाची गती फार संथ असून गती वाढवून कामे वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश आ. डॉ. परिणय फुके यांनी यंत्रणेला दिले.

गाळमुक्त धरण जलयुक्त शिवार योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी गोंदिया जिल्ह्यात आढावा व नियोजन कार्यशाळा जिल्हा परिषद सभागृहात शनिवारी (दि.२४) पार पडली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी प्रजित नायर, जि.प. अध्यक्ष लायकराम भेंडारकर, मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरगानंथम, उपवनसंरक्षक पवन जोग, प्रादेशिक जलसंधारण अधिकारी अनंत जगताप यांच्यासह पंकज रहांगडाले, मुनेश रहांगडाले, दीपा चंद्रिकापुरे, चेतन वडगाये, चित्रकला चौधरी, योगिता पुंड,एड.माधुरी रहांगडाले,रचना गहाणे आदी मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली गाळमुक्त धरण-जलयुक्त शिवार योजना अधिक प्रभावीपणे राबवून शेतकऱ्यांना पाण्याचा दीर्घकालीन लाभ मिळवून देण्यासाठी प्रशासन व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे असे आवाहन आ. डॉ. परिणय फुके यांनी केले. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात जिल्ह्यात एकूण १३१ कामे मंजूर करण्यात आली होती. या कामांतर्गत ११ लाख ३० हजार घनमीटर गाळ काढण्याचे नियोजन करण्यात आले होते. मात्र आतापर्यंत केवळ ४९ कामे पूर्ण झाली असून त्यातून २ लाख ४३ हजार घनमीटर गाळ काढण्यात आला आहे. केवळ ३८ टक्के कामांची पूर्तता झाली असल्याचे सांगितले.

## कामातील अडचणींचा आढावा

**बैठकी दरम्यान कामे अपूर्ण राहण्यामागील अडचणींचा सखोल आढावा घेण्यात आला. संबंधित एकाच व्यक्तीवर सर्व जबाबदारी येत असल्याने कामांना विलंब होत असल्याचे निदर्शनास आले. यापुढे अशा त्रुटी टाळण्यासाठी सर्व संबंधित संस्थांनी आधीच नियोजन करून कामांची स्पष्ट रूपरेषा तयार करावी, असे निर्देश आ. डॉ. परिणय फुके यांनी दिले.**

## चालू वर्षात ३६९ कामांचे नियोजन

**या योजनेमुळे जिल्ह्यातील पाणीसाठ्यात २४३.३५ घन मीटर वाढ झाल्याचे सादरीकरणाद्वारे दाखविण्यात आले. शिरपूर धरण हे याचे ठळक उदाहरण असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. मागीलवर्षी ५ कोटी रुपयांत १३१ कामांचे नियोजन करण्यात आले होते, तर चालू वर्षी ८ कोटी रुपयांत ३६९ कामांचे नियोजन करण्यात आले आहे.**